


बाबा चांद पाटलाची घोडी शोधून देतात.

# श्रीसाईनाथ स्मरणिका

## जाहिरातदारांना सुवर्णसंधी

श्रीसंत चूडामणि भगवान श्रीसाईबाबांचा साठावा निर्वाण महोत्सव येत्या विजयादशमीस येत आहे. हा सोहळा वर्षभर सर्वत्र साजरा होणार आहे. श्रीसाईबाबा संस्थान शिरडीने या निमित्य दोनशे पानांची मोहक, सचित्र व संग्राह्य अशी स्मरणिका प्रसिद्ध करण्याचे निश्चित केले आहे. ही स्मरणिका साईभक्तांना सप्रेम भेटीदाखल दिली जाणार असल्याने तिच्या सुमारे २५ हजारावर प्रती काढल्या जातील. या स्मरणिकेत भारतातील ज्येष्ठ व श्रेष्ठ अशा साईभक्तांचे, संस्थान हितचिंतकांचे श्रीबाबांच्यावरील वाचनीय लेख, शुभाशिष, संदेश इ. विविध अती उपयुक्त साहित्य असून काही पाने साईभक्तांच्या साहित्यासाठी राखून ठेवली आहेत. ही स्मरणिका भारतात व परदेशातही प्रसारित होईल.

या स्मरणिकेतील काही पाने खास जाहिरातीसाठी राखून ठेवली जाणार असल्याने साईभक्त उद्योगपती, व्यवसायबंधू, कारखानदार यांनी आपापल्या मालाच्या जाहिराती त्वरीत पाठवून आपली जागा आरक्षित करावी. जाहिराती पाठविण्याची अखेरची तारीख १५ ऑगस्ट १९७८ ही आहे. **स्मरणिकेचा आकार ७½" × १०"** असा राहील.

साईभक्तांसाठी जाहिरातीचे सवलतीचे दर –

| | |
|---|---|
| कव्हर पान क्रमांक २ | – ८०० रु. |
| कव्हर पान क्रमांक ३ | – ६०० रु. |
| कव्हर पान क्रमांक ४ | – १००० रु. |
| आतील मजकूराचे पूर्ण पान | – ५०० रु. |
| अर्धे पान | – २५० रु. |
| एक चतुर्थांश पान | – १२५ रु. |

जाहिरातीचा मजकूर, ब्लॉक्स इ. सर्व साहित्य पाठविण्याचे पत्ते—

१) साईनाथ स्मरणिका, द्वारा श्री कोर्टरिसिव्हरसाहेब, श्रीसाईबाबा संस्थान, मु. पो. शिरडी, ता. कोपरगाव, जि. अहमदनगर. ४२३१०९

२) श्रीसंपादक 'साईनाथ स्मरणिका,' साईनिकेतन, ८०४, बी. डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुं. ४०० ०१४

जगा लावावे सत्पथी । हेचि साईलीलेची कृति ॥



# श्रीसाई वाक्सुधा

संस्कारहीन अल्पशक्ति ।
काय आम्ही जाणूं भक्ति ।
टाकिलें जरी आम्हां समस्तीं ।
साई न देती अंतर ॥ ६ ॥

जयावरी ते कृपा करिती ।
अचिंत्य महाशक्ति पावती ।
आत्मानात्म विवेक संपत्ति ।
सवेंचि प्राप्ति ज्ञानाची ॥ ७ ॥

साईमुख वचन लालसे ।
भक्तजन होऊनि पिसे ।
शब्द शब्दांचे जोडूनि ठसे ।
पाहत भरंवसे प्रतीति ॥ ८ ॥

निजभक्तांचा मनोरथ ।
जाणे संपूर्ण साईनाथ ।
पुरविताही तोच समर्थ ।
तेणेंचि कृतार्थ तद्भक्त ॥ ९ ॥

धांव पाव गा साईनाथा ।
ठेविलों तुझिया चरणीं माथा ।
विसरोनियां अपराधां समस्तां ।
निवारीं चिंता दासाची ॥ १० ॥

—श्रीसाईसच्चरित अध्याय ३० वा


# श्रीसाईलीला

[ श्रीसाईबाबांचे संस्थान, शिरडीचे अधिकृत मासिक ]

वर्ष ५७ वे ] ऑगस्ट १९७८ [ अं. ५



: संपादक :

श्री. क. ही. काकरे,

रिसिव्हर श्रीसाईबाबा संस्थान, शिर्डी

: कार्यकारी संपादक :

- डॉ. श्री. दि. परचुरे, (इंग्रजी आवृत्ती)
- श्री. सदानंद चेंदवणकर (मराठी ,, )



वार्षिक वर्गणी रु. ६–०० (ट. ख. सह)

किरकोळ अंक ६० पैसे फक्त.



: कार्यालय :

"साईनिकेतन", प्लॉट नं. ८०४–बी,

डॉ. आंबेडकर पथ, दादर, मुंबई १४.

पिन : ४०००१४

दूरध्वनी : ४४ ३३ ६१

# श्री साईसेवा श्रेय नामावली ऑगस्ट–१९७८


| | |
|---|---|
| १) संपादकीय — | चणे खावे लोखंडाचे |
| २) कुळीचे श्री माऊली महाराज | – सदानंद चेंदवणकर |
| ३) युगावतार श्रीसाईबाबा–१५ | – श्री. चंद्रकांत सामंत |
| ४) श्री अवधूतस्वामी महाराज–अनुभव | – श्री. सुभाष पाटील |
| ५) बाबांच्या दरबारात जॉर्ज कर्टिस व बडोद्याच्या राजकन्या | – श्री. वि. बा. खेर |
| ६) श्रीसाईमंगलाचरण | – डॉ. अनिल जायस्वाल |
| ७) साईनामाचा महिमा | – श्री. विजय द. हजारे |
| ८) भगवान श्रीकृष्णाची जन्मकुंडली | – होरालंकार श्री. शं. वा. देवधर |
| ९) बाबांच्या पोथीचे सामर्थ्य | – डॉ. सुमन ल. खानविलकर |
| १०) अशी आहे साईलीला | – श्री. प. अ. जामसांडेकर |
| ११) प्रार्थना | – कु. मनोज चव्हाण |
| १२) श्रीसाईबाबांचा प्रभाव | – श्री. सदाशिव ग. कुलकर्णी |
| १३) श्री. जोशींच्या भक्तमंडळींचे अनुभव | — |
| १४) साईबाबांची ती मूर्ती | — |
| १५) मशिदीत प्रगटला परमेश्वर | — |
| १६) शिरडी वृत्त | — |
| १७) साईगीत | – श्री. एन. जी. परळेकर |
| १८) साईंचे मंदिरी | – सौ. माई आडकर |
| १९) श्रीसाई काव्य सुमनांजली | – सुनिल सरोदे |
| २०) श्रीसाई स्तुती | – श्री. भूरनदास बोरकर |
| २१) नमस्कार | – श्री. ग. रा. भट |
| २२) श्रीसाईचरणी इच्छा | – श्री. शिवाजी मोरे |
| २३) आशीर्वाद घ्यावा | – श्री. विनायक पाठक |

संपादकीय—

स. न. वि. वि.

# चणे खावे लोखंडाचे

आजकाल पहावे तो बाबांच्या भक्तांची संख्या बरीच वाढलेली दिसते. एक बाबांची तसबीर आणली आणि रोज तिच्यापुढे उदबत्ती पेटविली की झाला बाबांचा भक्त ! आणि मग या भक्तीच्या मोबदल्यात संसारातील सर्व अडचणी दूर करण्याचा पक्कर बाबांनी घेतला पाहिजे. त्यात कर्मधर्मसंयोगाने बाबांनी कृपाळू होऊन या भक्ताच्या हाकेला खरोखरच एखाद्या वेळी ओ दिल्यास मग काय विचारायलाच नको. त्याच्या आत्मप्रौढीला सीमाच उरत नाही. तो भक्ताचा एकदम महंतच होतो आणि हळूहळू बाबांची जागा हा महंतच बळकावून बसतो. डोळे उघडे ठेऊन जगाकडे पहाणाऱ्याला असे महंताचे खेळ पुष्कळ दिसतील. यात भक्तीला बाजारी स्वरूप येते. ‘ विनायकं प्रकुर्वाणो रचयामास वानरम् ’ असा प्रकार होतो. तेव्हा खऱ्या भक्ताची लक्षणे तरी काय हे जरा नीट तपासून पहाणे जरूर आहे.

## आशापाश तुटावे लागतात

आपण ही लक्षणे संतांनाच विचारू. ते म्हणतातः—

‘ भक्त ऐसे जाणा जे देही उदास।

गेले आशापाश तुटोनियां ।। ’

देहाचे ममत्व सुटले पाहिजे; आशापाश तुटले पाहिजेत. या दोनच कसोट्या लावून आपणाला बाबांचा भक्त म्हणवणाऱ्या गृहस्थाने स्वतःची कसोटी पहावी. स्वतःची स्वतःच फसवणूक मात्र करून घेऊ नये. आपण कितीजण या कसोटीला उतरू ? प्रत्येक प्राण्याची देहात्मबुद्धि व तिच्या अनुषंगाने येणारे आशापाश किती चिवट असतात व ते कसे तुटता तुटत नाहीत याचे एक उदाहरण पाहू.

## उपासनी बाबांची उपाधी

उपासनी बाबा हे प्रथम श्रीसाईबाबांकडे कसे आले व बाबांनी त्यांना काही साधन देऊन शिरडीच्या खंडोबाचे देवळात कसे बसवून ठेवले हे श्रीसाईसच्चरिताचे वाचकांना माहीत आहे. उपासनी बाबांचे ठिकाणी, संसारातील विविध तापांच्या कटु अनुभवामुळे बरेच तीव्र वैराग्य उत्पन्न झाले होते. तरीपण त्यांनी आपले ‘सर्वस्व’ बाबांना अर्पण केले नव्हते. काही हातचा ठेवला होता. मात्र जेव्हा त्यांच्या पत्नीच्या निधनाची वार्ता त्यांना समजली, त्यावेळी त्यांनी आपल्याजवळ बाळगून ठेवलेले ४१२

रुपये बाबांचे चरणी आणून ठेविले. असे सांगतात की तेव्हा श्रीसाईबाबांनी फार मोठा आनंद प्रदर्शित केला. त्यांचा भक्त आज एका मोठ्या उपाधीतून मुक्त झाला होता.

### ' मला ब्रह्म दाखवा '

ही झाली अधिकारी भक्ताची कथा. आशापाश तुटणे कशाला म्हणतात ते यावरून लक्षात येईल. नाहीतर परतीचा टांगा ठरवून बाबांचे दर्शनाला येऊन "बाबा मला अर्ध्या तासात ब्रह्म दाखवा" म्हणून आलेल्या गृहस्थाची बाबांनी केलेली गंमत आपणा सर्वांना माहित आहेच. अंतर्मुख होऊन थोडा विचार केल्यास, आपण बहुतेक मंडळी या दुसऱ्या प्रकारच्या गृहस्थाहून फारसे पुढे गेलो नाही असेच लक्षात येईल !

### संसार करावा ' उदास ' व्यवहारे

आपणाला खरोखरच बाबांचे भक्त व्हावयाचे असेल, नव्हे त्या दिशेने प्रयत्न करावयाचा असेल, तर उपासनी बाबांची कोटी तर सोडूनच द्या, पण निदान मेघा तरी होता येईल काय याचा विचार करावा. मेघा एक साधा आचारी. पण त्याची निष्ठा केवढी जबर, तो बाबांना प्रत्यक्ष शंकरच मानी. त्या निष्ठेच्या बळावर त्याने बाबांना गंगेचे सचैल स्नान घातले ! भक्ताने देवावर मात केली ! ही निष्ठा आपणाजवळ आहे का ? मेघाने बाबांसाठी घर, संसार, नोकरी चाकरी सर्व सोडली. आपण ती सोडू का ? आपण म्हणाल, त्याची नोकरी ती काय ! आचाऱ्याचीच ना ! पण भक्तीच्या प्रांतात वस्तूची किंमत त्याच्या मागील भावनेने, वृत्तीने ठरवावयाची असते. मेघाच्या त्यागाचे महत्त्व, रुपये-आणे पै नी मोजावयाचे नाही. पण ही गोष्ट तुम्हाला पटत नसली तर दुसरे उदाहरण देता येईल. काकासाहेब दीक्षीत बाबांकडे येण्यापूर्वी श्री व सरस्वती या उभयतांच्या कक्षेत नांदत होते. पण परमार्थमार्गाची गोडी बाबांचे संगतीत लागताच त्यांनी पैसा, कीर्ति यांचा मोह उराशी बाळगला नाही. त्याबद्दल ते ' उदास ' झाले. त्यांचे आशापाश तुटले. म्हणूनच त्यांना बाबांच सहवास घडला. त्यांची कृपा लाभली. भक्तपदासाठी लोखंडाचे चणे खावे लागतात, ते पद वाटते तितके सोपे नाही.

### जो विभक्त नाही तो भक्त

वर जी भक्ताची दोन लक्षणे सांगितली ती अभक्तांना भक्त ओळखता यावा म्हणून शाखाचंद्र न्यायाने समजावी. म्हणजेच भक्ताचे ठिकाणी ही लक्षणे असतात. पण एवढी लक्षणे दिसली तरी तो भक्त असेलच असे मात्र निश्चित सांगता येईल असे नाही. कारण जो विभक्त नाही तो भक्त. जो आपल्या ध्येय वस्तूशी एकरूपच

झालेला असतो आणि जेथे ध्येयवस्तू व्यतिरिक्त इतर सर्व वस्तूंविषयी उदासीनताही स्वाभाविकपणेच येते. तेथे अन्य विषयांचे आकर्षण आपोआपच नाहीसे होते. आशापाश आपोआपच तुटून जातात. अशी खरी परिस्थिती आहे. ध्येयाचे प्रेमाची वाढ म्हणजेच इतर विषयाबद्दलच्या आसक्तीमधे घट, असा खरा प्रकार आहे. द्वितीयेचा चंद्र चटकन दिसेना म्हणून जवळील झाडाच्या डहाळीची खूण सांगून दिशा दाखवावयाची. पण पुष्कळ मंडळींना फक्त डहाळीच दिसते. चंद्र शेवटी दिसतच नाही. या मंडळींचे संत श्रीरामदासस्वामींनी मोठे गमतीचे वर्णन केले आहे—

एवं ब्रम्ह देखणे हे तो टवाळी। साच मानिती कुचंबळी ॥
कल्पवृक्ष म्हणूनि भोंपळी। दाविजे जेवी ॥

यावरून लक्षात येईल की भक्त होणे वाटते तितके सोपे नाही. साईबाबा आपल्या भक्तांची कधीकधी मोठ्या गमतीने कसोटी पहात. बाबांनी एकदा एका मरणोन्मुख झालेल्या बकऱ्याला मारण्याचे काम आपल्या हिंदु भक्तांना सांगून त्यांची कशी परीक्षा घेतली याचे श्रीहेमाडपंतांनी आपल्या रसाळ वाणीने केलेले वर्णन श्री साईचरित्राचे वाचन करणाऱ्या वाचकास सहज आठवेल. पायाला हायूत आंबा बांधून श्रीरामदास स्वामींनी आपल्या शिष्यांची घेतलेलीही परीक्षा तुम्हाला आठवेल, पण अशीच एखादी परीक्षा तुमची आमची घेतल्यास निकाल काय लागेल हे सांगण्यास मोठ्या ज्योतिषाची गरजच नाही !

संत श्रीतुकाराम महाराज म्हणतात, 'ब्रह्मज्ञान नाही लेकुरांच्या गोष्टी' त्याप्रमाणे भक्तिप्रेम हे पण सहजासहजी मिळणारे नव्हे, 'तुका म्हणे येथे करायचे काम। मग आहे राम जवळीच ॥' किंवा संत श्रीज्ञानेश्वर महाराज म्हणतात त्याप्रमाणे आपल्या हृदयाचा चौरंग करून त्यावर श्रीगुरुची पाऊले स्थापन करून—

'तेथ अहं धूप जाळू। सोहंतेने ओवाळू'

कुरुळीचे नाथपंथी संत....

# श्रीमाऊली महाराज

–सदानंद चेंदवणकर
कार्यकारी संपादक श्रीसाईलीला

● पुणे जिल्ह्यात खेड तालुक्यात कुरुळी नावाचे एक आडगाव आहे. या गावच्या सभोवार पहावे तर शेतीचा परिसर दिसून येतो. शेतावर राबणाऱ्या शेतकऱ्यांच्या तुरळक अशा झोपड्या दिसून येतात. या गावच्या ग्रामदेवतेच्या देवळाजवळ एका माळरानावर एक मध्यमशी बैठी वास्तू आहे. लांबून ती वास्तू दिसते पण जवळ आल्यावर ते एक मंदिर आहे असे आढळून येते. हे मंदिर नाथपंथी सत्पुरुष ब्रह्मीभूत योगीराज श्री भालचंद्र महाराजांचे. देवळात आऊन गाभाऱ्यात दर्शन करून येणाऱ्याला श्रीभालचंद्र महाराजांची टवटवीत पुष्पमालांनी, पुष्पपाकळ्यांनी सालंकृत केलेली प्रतिमा दृष्टीस पडते. भालचंद्र महाराजांचे प्रमाणे गाभाऱ्यात श्रीसाईबाबा व भगवान श्रीदत्तात्रय यांच्याही प्रतिमा आहेत. सुमारे शंभर एक माणसे एकावेळी ऐसपैस बसतील



श्रीमाऊली महाराज

अशा या मंदिराच्या सभामंडपात एका कोपऱ्यात एक तरुण दिगंबर स्वामी योगिक पद्धतीने ध्यानस्थ असतात त्यांचे नाव आहे माऊली महाराज.

महाराजांचे दर्शन होताच कुणाही भाविकाचे हात जुळले जातात आणि मग महाराज त्यांना आशीर्वाद देतात. असे आज कैक वर्षे येथे चालले आहे. माऊली महाराज हे मूळ कोकणातले. त्यांचा जन्म रत्नागिरी जिल्ह्यातल्या खारेपाटण या गावी झाला. त्यांचे संपूर्ण नाव श्री. दत्तात्रय तायाराम राऊत. त्यांच्या मातोश्रींचे नाव नर्मदा. तीन पुत्र व तीन कन्या अशी सहा अपत्ये असलेल्या तायाराम राऊतांचे दत्तात्रय उर्फ माऊली हे सर्वांत धाकटे अपत्य. तायाराम हे खारेपाटणला शेती करीत.

छोट्या दत्तात्रेयाचे प्राथमिक शिक्षण खारेपाटणच्या शाळेत झाले पण शिक्षणात त्यांचे मन रमेना. जेमतेम अक्षरओळख व लिहिण्याबाचण्यासारखे शिक्षण मिळविल्यावर त्यांनी खारेपाटणला रामराम केला व नोकरी उद्योगधंद्याच्या निमित्ताने ते मुंबईला आले. मुंबईला लालबाग विभागात श्री. राणे नामक एका पानवाले मामांच्या गादीवर एक साधे नोकर म्हणून ते नोकरीस राहिले. त्यावेळी त्यांचे वय अवघे १२–१४ वर्षांचे होते. लालबाग परिसरात कणकवलीचे श्रीभालचंद्र महाराज अधून मधून येत असत. या नागडेमहाराजांचे दर्शन घेण्यास भाविकांची अतोनात गर्दी तेव्हा होत असे. एकदा असेच किशोर दत्तात्रय महाराजांचे दर्शनास गेले आणि महाराजांची व त्यांची दृष्टादृष्ट झाली आणि काय चमत्कार झाला कुणास ठाऊक ! दत्तात्रयाच्या अंगावरील कपडे अक्षरशः तिथल्या तिथे जे गळून पडले ते आजतागायत कायमचेच! त्याच क्षणी त्यांनी पानाची गादी सोडली व ते महाराजांकडे जे आकर्षिले गेले ते कायमचेच. महाराजांनी पुढे यथाक्रम त्यांना मार्गदर्शन केले इतके की महाराजांचे पश्चात् आज तेच महाराजांचे उत्तराधिकारी शिष्य म्हणून संप्रदायात ओळखले जातात.

श्रीमाऊली महाराज आज कुरुळीला येऊन दहा वर्षे झाली आहेत. येथे येण्यापूर्वी ते आळंदीजवळ चऱोली येथे मंदिरात चार वर्षे होते. बारा वर्षांपूर्वी ते आळंदीला गेले असताना तिथल्या ज्ञानेश्वर मंदिरातला हार ते साष्टांग नमस्कार करीत असताना आपोआप त्यांच्या गळयात येऊन पडला व तेव्हापासून त्यांच्या भक्तांनी त्यांना ‘ माऊली महाराज ’ हे जे नाव दिले ते आता अगदी कायमचेच म्हणा ना.

श्रीमाऊली महाराज आपल्या मंदिरात येणाऱ्यांचे स्वागत करतात, दर्शन देतात, शुभाशिष देतात; कुणी संकटात सापडलेल्याने त्यांना एखादा प्रश्न विचारला तर ते त्याचे निरसन करतात. पण हे सारे कुरुळी आश्रमाच्या जागेवरच. महाराज तिथून निघाले आणि कुठे मुंबई–पुणे–नाशिक इ. ठिकाणी गेले की ते अजिबात कुणाशीच बोलत नाहीत. त्यांचे शंभर टक्के मौन असते. बाहेरगावी प्रयाण करण्यापूर्वी ते भालचंद्र महाराजांची मनोमन प्रार्थना करतात. त्यांच्या पादुकांना वारंवार वंदन करतात, धुनीतील उदी आपल्या सर्वांगाला फासतात, शंखनाद करतात, त्यांची परवानगी घेतात आणि मगच प्रयाण करतात, आणि परत कुरुळीला आल्यावर मगच पुन्हा बोलण्यास सुरुवात करतात. कणकवलीच्या आश्रमात ते जाऊन येऊन असतात. माऊली महाराजांना प्रश्न विचारल्यावर ते जे अगदी पहिल्यांदा उत्तर देतात तेच ग्राह्य व प्रमाण मानले जाते व ते तंतोतंत खरे ठरते असा अनेक भाविकांना अनुभव आलेला आहे, येत आहे. त्यांनी अनेकांच्या शरीराचे ताप, दुःख बघता बघता नाहीसे केले आहे. कऱ्हाडच्या एका उद्योगपतींना अनेक वर्षे संतती नव्हती. ते माऊलींच्या दर्शनास आले व त्यांच्या शुभाशिषाने त्यांना पुत्र लाभ झाला. महाराजांच्या

प्रति श्रद्धेचे प्रतिक म्हणून त्यांनी एक मोटारगाडी त्यांना अर्पण केली आहे. त्या गाडीला त्यांनी भगवाच दिलेला आहे. आपला कुळीचा आश्रम प्रती शिरडी बनविण्याची त्यांची इच्छा आहे. या मंदिरात श्रीसाईबाबा, श्रीदत्तात्रय व श्रीभालचंद्र महाराज या तिघांच्या संगमरवरी मूर्ती बसविण्याचा त्यांनी संकल्प सोडला असून त्यांचा हा संकल्प नजिकच्या काळात सिद्धीला जावो अशी शुभेच्छा आम्ही मनापासून व्यक्त करतो. ●

## ☆ सगुणोपासना ☆

● कणकवलीचे ब्रम्हीभूत संत श्रीभालचंद्र महाराज यांच्या उपासना संबंधीचा हा संग्रह असून तो बाबांचे व महाराजांचे परमभक्त श्री. सुरेश सातपुते, बी. कॉम यांनी संपादित केला आहे. या पुस्तकात सर्वश्री सुरेश सातपुते, वामन ढोके, केशवराव, कवठकर, किसन सावंत, विठ्ठलराव शेवाळे, शशिकांत खेडेकर, पुंडलिक राणे इ० नी भालचंद्र महाराजांच्या संबंधीचे भक्तिभावाने गुणगान केले आहे महाराजांचे संबंधीची अनेक भक्तिगीते, अष्टक, त्रिपदी व अभंग या छोटेखानी पुस्तकात समाविष्ट आहेत. मुखपृष्ठावर महाराजांचे सुंदर चित्र आहे.

पृष्ठे – २४ * किंमत – १ रु. २५ पैसे



श्रीभालचंद्र महाराज

## ※ श्रीसमर्थ भालचंद्र रक्षास्तोत्र ※

श्रीभालचंद्र महाराजांच्या भक्तांसाठी ही नित्य पोथी असून ती अत्यंत साध्या, सोप्या व सुटसुटीत शब्दात व ओघवत्या धारावाही भाषेत लिहिली गेली आहे. पोथीत हे स्तोत्र कशा पद्धतीने वाचावे याचीही माहिती देण्यात आली आहे. पाने ३२, किंमत ६० पैसे. ही दोन्ही पुस्तके श्रीहनुमान मंदिर प्रकाशन, लालबाग, मुंबई ४०००१२ यांनी प्रकाशित केली आहेत.

# युगावतार श्रीसाईबाबा : १५

## ( श्रीसाईबाबा सत्संग मंडळ, सुरत ह्यांच्या सौजन्याने )

अनु. :– श्री. चंद्रकांत दामोदर सामंत

● श्रीसाईबाबांकडे येणाऱ्यामध्ये सर्व प्रकारचे भक्त असत. त्यापैकी प्रापंचिक विवंचनात गुंतलेल्यांचे प्रमाणच सर्वात अधिक होते. आध्यात्मिक आकांक्षेने ओढले गेलेले त्या मानाने फार थोडे असत. श्रीसाईनाथांनी स्वतःजवळचे भांडार सर्वांसाठी सदैव खुले ठेवले होते. जशी जशी ज्याची पात्रता व ग्रहणशक्ति असे तसतशी त्याला प्राप्ती होत असे.

वाई येथील श्रीनारायण आश्रमात पूर्वी गंगापुरी नावाचे एक संन्यासी होऊन गेले. त्यांचे गृहस्थाश्रमींचे नाव होते श्री. ठोसर. कस्टम्स खात्यात नोकरी करत असता १९१० साली त्यांना श्रीबाबांच्या दर्शनासाठी शिरडीस जाण्याचा योग आला. पहिल्या भेटीतच श्रीबाबांनी त्यांच्या विचारात जबरदस्त फरक घडवून आणला. " प्राणीमात्रात बाह्यतः जे भेद दिसून येतात ते सर्व वरवरचे आहेत जे काही सर्वव्यापी आहे तेच सत्य आहे. " वास्तविक पाहता असे विचार श्री. ठोसर ह्यांच्या मनात येण्यापूर्वी त्यांचे श्रीबाबांशी काही बोलणेही झाले नव्हते. तथापि श्रीबाबांचे मौन हे सुद्धा मोठे अर्थपूर्ण असे. केवळ नजरेने किंवा स्पर्शाने भक्तांना प्रभावित करण्याचे जबर सामर्थ्य श्रीबाबांच्यापाशी होते. स्वतःकडे येणाऱ्या भक्ताच्या डोक्यावर श्रीबाबा प्रेमाने थोपटत, कधीकधी कपाळावर बोटाने उदी लावताना चेपल्यासारखे करीत. तर कधी कधी थप्पडही लगावीत. ह्या प्रत्येक क्रियेला वेगळे महत्त्व व अर्थ असे. त्यायोगे भक्तांच्या मनातील विकल्प किंवा उद्वेग आपोआप दूर होऊन वाईट कल्पना व विचार नाहीसे होत. नुसत्या स्पर्शद्वारा अनेक विचार, भावना व शक्ति दुसऱ्या व्यक्तीच्या मनात जागृत करून त्याची सर्वांगीण उन्नती घडवून आणण्याची किमया श्रीबाबा करीत.

गंगापुरीना १९१४ साली प्रथमतः परमार्थाची ओळख करून देऊन श्रीबाबांनी पुढील प्रगतीसाठी त्यांची रवानगी श्रीवासुदेवानंद सरस्वती यांचेकडे केली. असे करण्यात श्रीबाबांचा हेतू संतांची एकात्मता दर्शविण्याचाही असू शकेल. आपल्या आध्यात्मिक जीवनातील उन्नतीला श्रीबाबाच कारणीभूत झाले असे त्यांचे म्हणणे होते. गाढ अंधारात निद्रा घेत पडलेल्या अज्ञान बांधवाना जागृत करून त्यांना परमेश्वराच्या सर्वांगीण व्यापकतेचे दर्शन श्रीबाबांनी घडविले ही त्यांची केवढी अलौकिक सेवा !

## कै. भगवान श्रीअवधूत स्वामी महाराज यांच्या सहवासातील

# माझे अनुभव

(लेखक :— कै. स्वामी महाराजांचे शिष्य श्री. सुभाष पाटील
उर्फ श्रीत्यागानंद स्वामी)

[ दादरचे सुविख्यात अध्यात्मवादी सत्पुरुष श्री. मोरेश्वर वासुदेव लिमये उर्फ श्रीअवधूत स्वामी महाराज यांचे २४ जून ७८ रोजी अचानक देहावसान झाले. त्यांचे एक सत्शिष्य श्री. सुभाष पाटील उर्फ श्रीत्यागानंद स्वामीजी यांनी पाठविलेला त्यांच्या सहवासातील एक अनुभव येथे प्रसिद्ध करीत असून आम्ही श्रीअवधूत स्वामींना अत्यादरपूर्वक श्रद्धांजली वाहात आहोत—— संपादक ]

कै. श्रीअवधूतस्वामी महाराजांकडे श्रीदत्तजयंतीचा उत्सव तीन दिवसांचा असे. उत्सवाच्या पहिल्या दिवशी सर्वारिष्टशांत्यर्थ यज्ञ करण्यात येत असे. त्यावेळी ब्राह्मण



अवधूत महाराज

उपाध्यायांना बोलावून श्रीमहाराज त्यांच्या करवी यज्ञ करवीत असत. एकदा एका श्रीदत्त जयंति उत्सवात यज्ञप्रसंगी अशाच काही सात-आठ वेदपाठी ब्राह्मणांस बोलावण्यात आले. ह्या ब्राह्मणांस हा यज्ञ एखाद्या सामान्य यजमानाच्या गृही नसून एका महान अधिकारी सत्पुरुषाकडे आहे हे ठाऊक होते व त्यामुळे श्रीमहाराज सांगतील त्याप्रमाणेच वस्तुतः यज्ञ पार पाडावयास पाहिजे होता. श्रीमहाराजांनी याबाबतची सर्व कल्पना त्यांना आगाऊच दिली होती. त्या ऋत्विक् ब्राह्मणांनी वेदोक्त मंत्र म्हटले व यज्ञ शेवटास आला असता सवयीप्रमाणे त्यांनी एकदम पूर्णाहुती देऊन टाकली. वास्तविक श्रीमहाराजांनी त्यांना सांगून ठेवले होते की, ‘ आमचा सांप्रदायिक गुरुमंत्र आहे तो आमचे शिष्य व आम्ही मनातल्या मनात जपू व फक्त ‘ अग्निनारायणाय स्वाहा ’ असे म्हटल्यावर तुम्ही आहुत्या टाकायच्या. ह्या श्रीगुरुमंत्रानीच पूर्णाहुती द्यावयाची आहे. ’ पण त्या ऋत्विजांना श्रीमहाराजांच्या सांप्रदायिक कार्याचे माहात्म्य आकलन न झाल्यामुळे ते पूर्णाहुती देऊन आधीच मोकळे

झाले होते. तेव्हा श्रीमहाराज त्यांना म्हणाले, ' श्रीगुरुमंत्राच्या आहुत्या टाकायच्या राहिल्या. त्या टाकल्याशिवाय यज्ञ समाप्ती करू नका. '

त्या ब्राह्मणांमध्ये श्री. गोखले आडनावाचे ब्राह्मण होते. ते म्हणाले, 'पूर्णाहुती देऊन झाली आहे. आता आम्ही कुठल्याही मंत्राची आहुती देणार नाही. ते शास्त्राला धरून होणार नाही. '

त्यांना महाराज म्हणाले, ' अहो, हा आमचा सांप्रदायिक यज्ञ आहे. त्याला तुम्ही तुमच्या शास्त्राचे नियम लावू नका. श्रीगुरुमंत्राच्या आहुत्या टाकल्याशिवाय हा आमचा यज्ञ पुरा होऊ शकत नाही, '

त्यावर गोखले म्हणाले, ' आम्ही शास्त्राज्ञा मानतो. दुसरे काही जाणत नाही.' गोखलेंचे श्रीमहाराजांशी हे जे उर्मट वर्तन चालले होते ते पाहून इतर ब्राह्मण म्हणाले, ' अहो तुम्ही असा वाद काय घालता ? ही कोणी साधी व्यक्ती नाही. मोठे सत्पुरुष महाराज आहेत. ते जशी आज्ञा करतील तसेच आपल्याला केले पाहिजे. '

त्यावर त्यांना गोखले म्हणाले, ' मी वेदांनाच प्रमाण मानतो. वेदांच्या पुढे महाराज काही मोठे नाहीत. तुम्हाला माझे ऐकायचे असेल तर ऐका. नाहीतर मी हा चाललो. मी या यज्ञात दक्षिणा वगैरे काही घेणार नाही. '

त्यांना ते ब्राह्मण मोठ्या अजिजीने म्हणाले, ' अहो गोखले, असे करू नका. ' पण वेदज्ञानाने गर्वित झालेले ते गोखले त्यांचे किंवा श्रीमहाराजांचे ऐकण्याच्या मनःस्थितीत नव्हते. ते उठून दक्षिणा न घेताच चालू पडले. तेव्हा महाराज म्हणाले, ' त्यांना नाही पसंत तर त्यांना जाऊ दे. आम्ही सांगितल्याप्रमाणे तुम्ही यज्ञ शेवटास न्या. '

गोखले निघून गेल्यावर मग महाराजांसह सर्व शिष्यांनी मनातल्या मनात श्रीगुरुमंत्राचा जप केला व प्रत्येक जपाबरोबर ' अग्निनारायणाय स्वाहा ' म्हटल्यावर ऋत्विज आहुत्या टाकीत होते. याप्रमाणे श्रीगुरुमंत्राच्या १०८ आहुत्या देऊन झाल्यावर यज्ञसमाप्ती झाली. नंतर ब्राह्मणांना दक्षिणा व प्रसाद देऊन त्यांची बोळवण केली.

पुढे ज्या गोखले ब्राह्मणाने महाराजांची आज्ञा न मानता त्यांना विरोध केला व तरातरा निघून गेले त्यांना भ्रम निर्माण झाला. त्यांना एक भयानक काळा पुरुष मागे लागला आहे असा सारखा भास होत होता. त्यांना त्यामुळे शारीरिक व मानसिक स्वस्थता नव्हती. संबंधित ब्राह्मणांनी गोखलेंना सांगितले की, ' तुम्ही महाराजांचा अपराध केला म्हणून तुम्हाला हा भ्रम झाला आहे. तुम्ही महाराजांना शरण जा व त्यांची क्षमा मागा म्हणजे तुमचा हा भ्रम जाईल पहा. ' पण गोखलेंनी अहंकारापोटी त्यांचे ऐकले नाही. पुढे ते गावाला गेले. जे काय त्यांना शक्य ते

उपाय केले. पण जो काळा पुरुष त्यांच्या मागे लागला तो काही त्यांची पाठ सोडायला तयार नव्हता. पुढे ते पुन्हा मुंबईला आले. पण तरीसुद्धा त्यांना महाराजांना शरण जायची बुद्धी झाली नाही. त्या ब्राह्मणात महाराजांचे एक श्री. वापट गुरुजी म्हणून शिष्य होते. ते महाराजांना हे वृत्त सांगत होते. त्यांना महाराज म्हणाले–' त्यांना ज्या यातना भोगाव्या लागतात यात आम्ही स्वतः काहीच केले नाही. परमेश्वराच्या कार्याला त्यांनी आपल्या अहंकाराने विरोध केला. त्यांच्या कर्माचे फळ त्याना भोगावे लागते. परमेश्वरानेच त्यांना क्षमा केली तरच त्यांची यातून सुटका होईल. त्यासाठी त्यांना मात्र आमच्याकडे येऊन घडल्या अपराधाबद्दल पश्चाताप होऊन क्षमा मागायला पाहिजे एवढे खरे ते तर त्यांच्याने घडायचे नाही. मग त्यांना भ्रम झाला त्याला आमचा तरी काय इलाज आहे ! '

श्रीमहाराज अत्यंत दयाशील व क्षमाशील याचा मी स्वतः खूप अनुभव घेतला आहे. पण जे अनादराने व अहंकाराने वागतात त्यांना त्यांची दया व क्षमा कशी अनुभवता येईल ! ऋत्विजांविषयी श्रीमहाराजांना आलेले इतर अनुभवही फार कटू होते. पहाटे तीन वाजल्यापासून हरितालिका किंवा गणेशपूजेसाठी केवळ धनलोभाने धावधाव करणारे ब्राह्मण, तोंडात पान-तंबाखूचा तोबरा भरून वेदमंत्र म्हणणारे ब्राम्हण किंवा आंघोळीला फुरसत नाही म्हणून तसेच यजमानगृही पूजेला पळणारे ब्राम्हण महाराजांनी पाहिले होते. त्यावरून वेदविद्येच्या पावित्र्याचा लोप झाल्याचे त्यांना दिसून आले आणि श्रीमहाराजांनी ऋत्विक् ब्राम्हणांकरवी यज्ञादिक करणे बंद केले. ' जो ब्रम्होपासना करतो तोच ब्राम्हण होय ', अशी त्यांची धारणा होती; त्याच न्यायाने ते आपल्या शिष्यांना ब्राम्हण संबोधत, मग व्यवहारात त्यांची जात कुठलीही असू दे. मी स्वतः जातीने कोळी. पण मला त्यांनी द्विजत्व व शिष्यत्व दिले ते याच धारणेने. हाच त्यांचा अभेदभाव व मानवताधर्म होता. त्यांच्या माहात्म्याला पारावार नाही. ●

---

श्री. सदानंद चेंदवणकर यांचे ५१ वे पुस्तक—

☆

'श्रीसाईसच्चरित' पोथीचा सुरस मराठी अनुवाद

★

—लवकरच प्रसिद्ध होणार !

साईबाबांच्या दरबारात—

# सर जॉर्ज कर्टिस व बडोद्याच्या राजकन्या

—श्री. वि. वा. खेर
'अलका' १४ वा रस्ता, खार, मुंबई

● साईबाबा शिर्डीस नक्की केव्हा आले याबद्दल निश्चित माहिती उपलब्ध नाही. परंतु जी काही माहिती श्री. बी. व्ही. नृसिंहस्वामींनी जमा केली आहे त्यावरून १८६८ ते १८७२ च्या दरम्यान शिर्डीत त्यांचे आगमन झाले असावे व त्यावेळी त्यांचे वय २५ ते ३० असावे असा बोध होतो. त्या काळापासून तो १९१८ मध्ये समाधि घेईपर्यंत साईबाबांचे शिर्डीत अखंड वास्तव्य होते. बरीच वर्षे श्रीसाईबाबांची वेडा फकीर म्हणून शिर्डीत प्रसिद्धी होती व गावातील लोकांनी त्यांची उपेक्षाच केली. १८८८-८९ मध्ये गावातील वाण्यांनी एकदा तेल द्यावयाचे नाकारल्यामुळे बाबांनी पणत्यात पाणी घालून त्या पेटवून रात्रभर जळत ठेवण्याचा चमत्कार केल्यामुळे लोकांचे लक्ष त्यांच्याकडे वेधले व हळू हळू शेजारच्या गावातील मुलकी अधिकारी त्यांच्याकडे येऊ लागले. परिणामें नानासाहेब चांदोरकर (मामलतदार प्रांत) हे बाबांचे एकनिष्ठ भक्त बनले. जेथे जात तेथे ते बाबांचे गुणगान करीत व त्यामुळे आणखी दोन व्यक्ती बाबांकडे आकर्षित झाल्या; त्या म्हणजे गणेश दत्तात्रय सहस्र-बुद्धे उर्फ दासगणू व हरी सीताराम उर्फ काकासाहेब दीक्षित. १९१० पासून दास-गणूंच्या झंझावाती कीर्तनांनी व दीक्षितांनी बाबांचे दारयश परकरल्यामुळे बाबांची महती वाढली व मुंबई आणि ठाणे जिल्ह्यातील हजारो लोक त्यांच्या दर्शनास जाऊ लागले.

त्या काळी सर्व वरिष्ठ सरकारी अंमलदार इंग्रज असत. ता. १० मार्च १९११ ला सकाळी सात वाजण्याचे सुमारास काकासाहेब दीक्षित माधवराव देश-पांड्यांसह मुंबईस रवाना झाल्यानंतर बाबा एकाएकी आपली कफनी वर करून म्हणाले, "साला हमकू देखनेकू आता है, हमारे पास क्या है ? हम तो नंगा फकीर है। आगे लंड और पीछे गांड" हे उद्गार ऐकून मशिदीत (द्वारकामाईत) अस-लेली सर्व मंडळी चकित झाली कारण आसपास कोणीही त्रयस्थ नव्हता. परंतु थोड्याच वेळात सर जॉर्ज कर्टिस (त्यावेळी ते मध्यभागाचे कमिशनर होते व "सर" हा किताब त्यांना प्राप्त झाला नव्हता), लेडी कर्टिस, अहमदनगर जिल्ह्याचे कले-क्टर मॅकलीनसाहेब व कर्टिससाहेबांचे नेटिव्ह असिस्टंट रावबहादुर रामचंद्र नारायण जोगळेकर शिर्डीस येऊन पोचले. या मंडळींच्या आगमनाची आगाऊ वार्ता कोणास नव्हती. लेडी कर्टिस यांना संतकृपा झाल्यास आपल्याला मूल होईल या आशेने

पतीस घेऊन बाबांच्या आशिर्वादासाठी त्या शिर्डीस आल्या होत्या. पाहुणे मंडळी मशिदीवरून चावडीकडे गेली. त्यांना पाहताच तेथील पाटील, कुळकर्ण्यांची एकच धांदल उडाली. त्यांनी चावडीत ताबडतोब तीनच खुर्च्या आणविल्या. साहेबांच्या स्वाऱ्या खुर्च्यांवर बसल्या, मात्र रावबहादुर जोगळेकरांवर उभे रहाण्याची पाळी आली. जोगळेकरांना चौकशीअंती समजले की त्यांचे मित्र बाळासाहेब भाटे (पेन्शनर मामलतदार व बाबांचे भक्त) शिरडीत आहेत. लागलीच चावडीत येऊन भेटण्याविषयी भाट्यांना जोगळेकरांचा निरोप गेला. बोलावण्यास आलेल्या पट्टेवाल्यास भाट्यांनी जबाब दिला की, 'मी येत नाही असे भाऊसाहेबांना सांग.' नीळकंठ रामचंद्र सहस्रबुद्धे तेथेच होते. त्यांनी पट्टेवाल्यास सांगितले की जोगळेकरसाहेबांना मी भाटे साहेबांच्या घरी बोलाविले आहे म्हणून सांग. त्याप्रमाणे जोगळेकरच भाट्यांच्या घरी आले व नंतर ते तिघेजण चावडीत गेले. तेथे गेल्यावर जोगळेकर सहस्रबुद्ध्यांना म्हणाले की, साईबाबांना आपला प्रातर्विधी लवकर आटोपण्यास सांगा कारण साहेबांना त्यांची भेट घ्यावयाची आहे. सहस्रबुद्धे आश्चर्याने म्हणाले, 'बाबांसारख्या थोर कोटीतील संताजवळ अशी अरेरावी कशी चालणार? तुमचे काही काम असल्यास बाबांच्या मर्जीप्रमाणेच तुम्हाला वागले पाहिजे.' त्यामुळे साईबाबा चावडीवरून नित्याच्या भिक्षेस जात त्यांची सर्व वाट पहात राहिले.

साहेब लोक आले त्यावेळी बाबांचे तोंडधुणे चालले होते. तोंडधुणे झाल्यावर नित्यक्रमाप्रमाणे बाबा भिक्षेला निघाले. सुमारे अर्ध्या तासाने बाबा चावडीपुढे आले. लेडी कर्टिस चावडीतून खाली आल्या व आदबीने बाबांजवळ येऊन म्हणाल्या, 'आपके साथ कुछ बात करनेकी है,' त्यावर 'अर्धा घंटा ठेर जाव' असे म्हणून बाबांची स्वारी पुढे गेली. अर्ध्या घटकेनंतर भिक्षेहून बाबा परत जाताना लेडी कर्टिसने पूर्ववत प्रमाण करून तीच विनंती केली तेव्हा 'एक घंटा ठेर जाव' असे सांगून बाबा मशिदीत गेले.

हा प्रकार झाला ती वेळ न्याहरीची होती. गोऱ्या साहेबांना सवड नसल्यामुळे व शिरडी येथे नवल विशेष काहीच न दिसल्यामुळे ती मंडळी माघारी फिरली. जाण्यापूर्वी कर्टिससाहेबानी गरिबाना वाटण्याकरिता सहस्रबुद्ध्यांना पाच रुपये दिले. ते ऐकून सहस्रबुद्ध्यांनी उत्तर दिले, 'मी तुमची रक्कम साईबाबांच्या हवाली करीन परंतु गरिबाना वाटून देण्याचीच आपली इच्छा असल्यास ती कामगिरी पाटील–कुळकर्ण्यांना सांगावी.' हे शब्द ऐकून कर्टिससाहेबांनी 'तुम्हास योग्य वाटेल ते तुम्ही करा' असे सांगून पुढे गेले. मॅकलीनसाहेबानीसुद्धा सहस्रबुद्ध्यांना पाच रुपये दिले व जोगळेकरानी दोन. ती सारी रक्कम सहस्रबुद्ध्यांनी बाबांकडे पाठवून दिली पण बाबांकडून ती परत आल्याने सहस्रबुद्ध्यांनी आणखी एक वेळा

बाबांकडे पाठविली तेव्हा ती त्यांनी घेऊन जवळ बसलेल्या एका गरीब इसमाला देऊन टाकली. थोड्याच वेळाने ती अधिकारी मंडळी नगरला गेली व दोन तासानी सहस्रबुद्धे आरतीसाठी मशिदीत गेले तेव्हा बाबांनी त्यांना विचारले, 'त्या गव्हर्नर साहेबाने दिलेले तीस रुपये मला दे.' आपल्याला माहीत असलेली त्या रुपयांची सर्व हकीकत सांगून सहस्रबुद्धे म्हणाले की, मिळालेले सर्व रुपये बाबांकडे त्यांनी लागलीच पाठवून दिले होते परंतु बाबांची इच्छा असल्यास स्वतःचे आणखी अठरा रुपये आणून देण्यास तयार होते. हे ऐकून बाबा म्हणाले की त्या गोऱ्या साहेबांकडून एकंदर तीस रुपये येणार होते व त्यांना सहस्रबुद्धयांचे पैसे नको होते. बाबांचे बोल वृथा असणे शक्य नाही ही खात्री असल्याने सहस्रबुद्धे बुचकळ्यात पडले. हे गूढ जरी लगेच उकलेले नाही तरी लेडी कर्टिसना विचारून कळविण्याविषयी सहस्रबुद्धयांनी रावबहादुर जोगळेकराना लांबलचक पत्र पाठविले. त्याच्या उत्तरात त्यांनी कर्टिससाहेब व त्यांची भार्या या उभयतांमध्ये या विषयासंबंधी जो संवाद झाला होता तो लिहून कळविला. त्याप्रमाणे सहस्रबुद्धयांना पाच रुपये देण्याअगोदर कर्टिस साहेबांनी शिरडीतील गरीबगुरिबाना वाटण्याकरिता एक रुपया देण्याचा मानस त्यांनी आपल्या पत्नीस सांगितला तेव्हां त्याना (लेडी कर्टिसना) खेद होऊन त्या म्हणाल्या होत्या की आपला अधिकार, प्राप्ति आणि वैभव यांचा विचार करता आपण निदान पंचवीस रुपये तरी दिलेच पाहिजेत. परंतु कर्टिस साहेबानी मोठा धीर करून मिनतवारीने सहस्रबुद्धयांच्या हातावर पाच रुपये ठेविले होते. कर्टिस साहेबांचे रुपये पंचवीस व मॅकलीन साहेबांचे रुपये पाच, मिळून तीस रुपयांची रक्कम बाबांनी त्यांच्यापाशी मागितली होती अशी सहस्रबुद्धयांची मागाहून सप्रमाण खात्री झाली. लेडी कर्टिसची श्रद्धा दृढतम नसल्यामुळे बाबांनी त्यांची कसोटी घेतली व त्यास त्या न उतरल्यामुळे त्यांचा पुत्रप्राप्तिसाठी बाबांचा आशिर्वाद मिळविण्याचा इरादा फलद्रुप झाला नाही. परंतु येथे नमूद केले पाहिजे की या गोष्टीनंतर थोड्याच काळात कर्टिस साहेबांची मुंबईच्या गव्हर्नरच्या एक्झिक्युटिव्ह काऊन्सिलचे व्हाइस प्रेसिडेंट या पदावर बढती झाली होती. [१]

वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्यांप्रमाणे राजेरजवाडेसुद्धा बाबांच्या भेटीस येत. १९०४ साली बडोद्याच्या राजघराण्यातल्या बाईसाहेब बाबांच्या दर्शनासाठी मुंबईचे प्रख्यात डॉक्टर व सर फिरोजशहा मेहतांचे मित्र सर भालचंद्र भाटवडेकर यांच्याबरोबर आल्या होत्या. बाईसाहेबानी एक थाळी रुपयानी भरलेली व दुसरी थाळी गिनीनी भरलेली अशा दोन थाळ्या बाबांसमोर ठेवल्या. बाबांनी त्यांना हात न लावता त्या परत केल्या. त्यावेळी बाबांचे म्हाळसापति नावाचे निर्धन परंतु परम भक्त जवळ बसले होते. त्यांना बाईसाहेबांनी थोड्या गिनी देऊ केल्या. त्या घ्याव्या की नाही याबद्दल म्हाळसापतीनी बाबांकडे पृच्छा केली असता बाबा म्हणाले, 'आप-

त्याला गिनींशी काय कर्तव्य? आपल्याला आपली गरीबीच चांगली.' त्यामुळे म्हाळसापतींनी ती भेट स्वीकारली नाही.[2]

टीपा—

१ श्रीसाईलीला, वर्ष ८, अंक ४, पृष्ठ ७ व श्रीसाईलीला, वर्ष ३, अंक ८, पृष्ठ ३९७.

२ अमीदास भवानीदास मेहता, पूर्ण परब्रम्ह श्रीसद्गुरु साईनाथ महाराजानी जाणवाजोग विगतो तेमज चमत्कारो (गुजराथी), १९१८, पृष्ठ २२.

# श्रीसाई-मंगलाचरण

– डॉ. अनिल जायस्वाल,
द्वारा श्रीसाई क्लिनिक, चिताओळ,
नागपूर–२ पिन ४४०००२

वाचकहो !

शास्त्रात म्हटलेले आहे की, सत्कर्मात नाना प्रकारची विघ्ने उद्भवतात. सत्कर्मात अनेक अडथळ्यांना तोंड द्यावे लागते. त्या सर्वांच्या निवारणार्थ मंगलाचरणाची आवश्यकता भासते.

श्रीसाई-सत्यनारायण असो वा मग ती कोणत्याही देवादिकांची उपासना असो; त्यास सम्मिलित होण्याअगोदरसुद्धा मंगलाचरण केले पाहिजे, असे आपल्या संस्कृतीतील शास्त्र-पुराणात उपदेशिले गेलेले आहे.

जन्माद्यस्य यतोऽन्वयादितरतश्चार्थेष्वभिज्ञः स्वरात्
तेने ब्रह्म हृदा य आदिकवये मुह्यन्ति यत्सूरयः ।
तेजोवारिमृदां यथा विनिमयो यत्र त्रिसर्गोऽमृषा
धाम्ना स्वेन सदा निरस्तकुहकं सत्यं परं धीमहि ॥

– (श्रीमद्भागवत प्रथम स्कंध)

धर्मग्रंथात पुढे असेही निवेदिले गेलेले आहे की सत्कर्म करताना देवगणसुद्धा विक्षेप निर्माण करतात. ही गोष्ट कितपत सत्य आहे हे समजण्याची पात्रता कमीत कमी लेखकात तरी नाही. प्राणीमात्राने श्रीसाईसमर्थांचे ध्यान केल्यास तो सुद्धा देवादिकांच्या पातळीस पोहचेल की काय हीच भीती कदाचित देवगणास वाटत असावी

व परिणामस्वरूपच ते अडथळे निर्माण करण्याइतपर ईर्ष्या करीत असावे असे लेखकास वाटते. असो.

जीव समकक्षेचा अधिकारी होईल तथापि सर्व देवाना आव्हान करून त्यांची प्रार्थना करणे अत्यावश्यक आहे. सत्कर्माच्या शुभारंभी त्यांना आळवावे :—

" आपली पात्रता थोर व पवित्र आहे. आमच्या कल्याणाच्या हितार्थचही अनमोल स्वरूपाची मानव–योनी आपल्याच आशिर्वादास्तव आम्हास मिळालेली आहे. या जन्मी काही सत्कर्म करण्याची सुबुद्धी व सुवर्ण–संधी आम्हास आपल्याच कृपेस्तव लाभत असेल तर कोणत्याही प्रकारचे विघ्न उद्भवू नये–याविषयी आपणच आशिर्वाद द्यावा. विघ्नहर्ता गणपतीची स्तुति करून, सूर्यदेव आमचे कल्याण करोत, वरूणदेव आमचेवर कृपादृष्टी ठेवोत." अशी याचना आपणास केलीच पाहिजे.

ज्यांचे आचरण मंगलमय आहे,
त्यांचे ध्यान करणे,
वंदन करणे,
मनन–चिंतन करणे,
सदासर्वदा स्मरण करणे,
म्हणजेच 'मंगलाचरण' आहे.

शिर्डीचे श्री सच्चितानंद भगवंत श्रीसाईनाथ–हे ईश्वर रुपाने आपणा सर्वांस लाभलेले आहेत. त्यांच्याच छत्रछायेखाली आपण सध्या वावरत आहोत. त्यांची मंगलमय कृपादृष्टी आपणा सर्वांवरच आहे.

साई नाम व
धाम शिर्डीग्राम.

हे सर्व मंगलमय आहे. या श्रीसाईसमर्थांवर परमपूज्य दासगणू महाराजांनी रचिलेले एक पद श्रीसाईसच्चरितातील अध्याय ४ मध्ये उद्घोषित करण्यात आलेले आहे. माझ्या अल्पमतिनुसार मला हे 'श्रीसाई मंगलाचरण'–च वाटते, असे म्हटल्यास मुळीच अतिशयोक्ती होणार नाही. ते पद खाली उल्लेखित केले प्रमाणे आहे.

अगाध शक्ति अघटित लीला तव सद्गुरूराया ।
जडजीवातें भविं ताराया तूं नौका सदया ॥ ध्रु० ॥
वेणीमाधव आपण होऊनि प्रयाग पद केलें ।
गंगा यमूना द्वय अंगुष्ठीं प्रवाह दाखविले ॥ १ ॥

कमलोद्भव कमलावर शिवहर त्रिगुणात्मक मूर्ती ।
तूंचि होऊन साई समर्था विचरसि भूवरती ॥ २ ॥
प्रहर दिसाला ब्रम्हासम तें ज्ञान मुखें वदसी ।
तमोगुणाला धरूनि रूद्ररूप कधिं कधि दाखविसी ॥ ३ ॥
कधीं कधीं श्रीकृष्णासम त्या बाललिला करिसी ।
भक्तमनासी सरस करूनि मराळ तूं बनसी ॥ ४ ॥
यवन म्हणावे तरी ठेविसी गोधावर प्रेमा ।
हिंदु म्हणूं तरि सदैव बससी मशिदींत सुखधामा ॥ ५ ॥
धनिक म्हणावे जरि तुला तरि भिक्षाटन करिसी ।
फकिर म्हणावे तरी कुबेरा दानें लाजविसी ॥ ६ ॥
तवौकसाते मशिद म्हणू तरि वन्ही ते ठाया ।
धुनित सदा प्रज्वलीत राहे उदि लोकां द्याया ॥ ७ ॥
सकाळपासुनी भक्त सावडे पूजन तव करिती ।
माध्यान्हीला दिनकर येतां होत असे आरती ॥ ८ ॥
चहुबाजूंना पार्षद्गणसम भक्त उभे राहती ।
चौरि चामरें करीं धरूनी तुजवर ढाळीती ॥ ९ ॥
शिंग घड्याळे सूर सनय्या दणदणते घंटा ।
चोपदार ललकारति द्वारीं घालुनियां पट्टा ॥ १० ॥
आरतीसमयीं दिव्यासनि तूं कमलावर दिससी ।
प्रदोषकाळीं बसुनि धुनिपुढें मदनदहन होसी ॥ ११ ॥
अशा लीला त्या त्रयदेवांच्या प्रत्यहिं तव ठायी ।
प्रचीतीस येताती अमुच्या हे बाबा साई ॥ १२ ॥
ऐसें असतां उगीच मन्मन भटकत हें फिरते ।
आतां विनंती हीच तुला बा स्थिर करी त्याते ॥ १३ ॥
अधमाधम मी महापातकी शरण तुझ्या पाया ।
आलो निवारा दासगणूचे त्रिताप गुरूराया ॥ १४ ॥

कोणत्याही सांसारीक जीवांचे वा वस्तूंचे चिंतन करणे व्यर्थच म्हणायचे. हा सर्व मोहमायेचा पसारा आहे हे आपण ओळखून आहोत. या देहाची चमडीसुद्धा मरणोपरांत आपल्या सोबत जाणार नाही. तर दमडी कुठून जाणार. कोण कुणाचा कुठपर्यंत साथ देणार ?

अहो! आपण पाहतच आहो; की आपला कोणी आप्त–बंधु मेला तर त्याचे शव शक्यतो त्वरीत नेऊन स्मशानघाटावर जाळतात. दोन दिवस त्याचे सगे–सोयरे रडतात. त्याची प्रियपत्नीदेखील गळा फाडून लयबद्ध तालाने रडते. अश्रू गाळते परंतु शवास घराबाहेर काढण्यास कोणी कधीच दिरंगाई करत नाही. पत्नी देखील एक हाराची माळ गळयात टाकून निरोप घेते. दोन-चार दिवसातच सर्व काही पूर्ववत चालणे सुरू होते. "मी आपला साथ कधीच सोडणार नाही" –असे म्हणणारी त्याची प्रिय पत्नीसुद्धा पूर्ववत जेवण करते.

परंतु मायेचे बंधन आपणास किती तीव्रतेने जखडून आहे. हे सर्व जाणत असूनसुद्धा सांसारीक मोहमायेचा पसारा आपल्या मनास भुरळ पाडतोच. तो आपणा सर्वांस लुभावितो, आकृष्ट करतो, भुरळ पाडतो. तरीपण गृहस्थाश्रमाचा त्याग न करता आपणास परमानंदाची प्राप्ती करायची आहे. आपण शक्यतोंवर कोणत्याही वस्तुविषयी विषयासक्ती बाळगू नये–हेच बरे. इतके असूनसुद्धा आपण सर्व आसक्तीतच गुरफटलेले आहोत.

लिहिणे सोपे।
सांगणे सोपे।
परंतु तेच
कृतीत उतरविणे
फारच कठीण आहे॥

दुर्दैवाने या ओळीं आपणासमोर सादर करणारा अल्पमती पामरसुद्धा या विषयासक्तीतच गुरफटलेला आहे. वाईट कर्म, पाप-कृत्य आपल्या हातून नित्यनियमित घडत असतात. ते सर्व करताना आपणास मुळीच लाज वाटत नाही. तर मग स्वतःची कमजोरी सांगण्यास लाज कशाला? कमीत कमी मी तरी एकाग्रतेने स्थिर मन ठेवून नित्यनेमे निदान अवघे दोन क्षणसुद्धा त्या दयाळू साईमाऊलीचे स्मरण-चिंतन; ध्यान-धारणा मुळीच करू शकत नाही-हे एक कठोर-सत्य आहे. कारण

मज आकर्षिते विषयासक्ती।
श्रीसाईमाऊली असे महाशक्ती॥
स्मरण–ध्यान–चिंतन–भक्ती।
यांची माझ्यात तरी काय शक्ती?

असो. तरीपण श्रीसाई–समर्थांचे चिंतन–ध्यान केल्यास त्या महान प्रभूची शक्ती मानवास निश्चितपणे प्राप्त होते–हे सत्य मी लपवू शकत नाही. वरील सत्य मी अनुभवलेले आहे. आपल्या कृतीत वा क्रियेत येणारी अमंगलता कामवासनेमुळेच आहे.

काम ज्या कोणास स्पर्श करतो, वासना ज्यास सतावित, प्रभावित करते, त्याचे सर्व काही अमंगलच असते. मग तो धनाढ्य असो वा गरीब डॉक्टर असो वा चांभार.

शिंपी कपडे शिवतो.
डॉक्टर चामडी शिवतो
व चांभार जोडे शिवतो
श्रीमंत ' डनलपपिलो 'च्या गादीवर लोळतो.
तर गरीब फुटपाथावर झोपतो.

परंतु चिंता सर्वांनाच जडलेली आहे. 'कसे होईल ? काय होईल ?' असले विचार-चक्र अमंगलतेमुळेच फिरत असते. मनात नाना तऱ्हेचे संकल्प--विकल्प डोकावतात. परिणाम स्वरूपच आपणापैकीच अनेक ज्योतिषाकडे धावतात. परंतु अलीकडचे ज्योतिषी यजमानांची ' ग्रह-शांति ' सोडून स्वतःचीच ' गृह-शांती ' करू लागले आहेत. हे सर्व अमंगलतेच्या छायेखालीच घडत असते. परंतु श्रीसाईसमर्थांस काम-वासना कधीच स्पर्श करू शकली नाही. परिणामस्वरूप त्यांचे सर्व काही मंगलमय आहे. ज्याच्या मनी काम-वासना वसलेली आहे त्याचे स्मरण केल्यास आपल्याही मनी काम-वासना उद्भवेल.

सकामच्या चिंतनाने सकामता येते.
तर निष्कामच्या चिंतनाने निष्कामता येते.

शास्त्रात उल्लेखित केल्याप्रमाणे देवाधिदेव श्री महादेव-शिव-शंकराचे--सर्वकाही अमंगल असूनदेखील त्यांचे स्मरण चिंतन मंगलमय म्हटले गेलेले आहे. असे का ? असला प्रश्न साहजिकच उद्भवतो. त्याला उत्तर एकच की त्यांनी कामदेवास त्रिनेत्रांद्वारे भस्मीभूत केले होते.

अर्थात मानव जोपर्यंत सकाम आहे तोपर्यंत त्याचे मंगल होऊच शकत नाही. श्रीसाईसमर्थ पूर्णतः निष्काम आहेत. त्यांचेच स्मरण-चिंतन आपण करावे. त्यांना समजण्यास मानव-बुद्धी असमर्थ ठरते. त्यांची महिमाच न्यारी आहे. बुद्धी सामर्थ्याच्या पलीकडील गोष्ट ती. श्रीसाईनाथांचा ध्यान करणारा जीव निष्काम बनतो. त्यांचे ध्यान करता आले नाही तरी चालेल. परंतु जगातील स्त्री-पुरुषाचे ध्यान कमीत कमी आपण चुकूनही करू नये. प्रत्येकात श्रीसाई समर्थांचे मंगलमय स्वरूप पाहाणे व त्याच्याच चिंतनात आनंदमय होणे म्हणजे---

तेच ' श्रीसाई-मंगलाचरण '

# — साईनामाचा महिमा —

– श्री. विजय द. हजारे, एम्. ए.
सी/६, गुंफादर्शन, फर्स्ट कार्टर रोड,
बोरीवली पूर्व, मुं. ६६

● श्रीसाईकृपेचा, साईप्रसादाचा अनुभव आजपर्यंत अनेक साईभक्तांना आलेला आहे. हरघडी येतो आहे आणि पुढेदेखील जोपर्यंत दिवसरात्रीचे कालचक्र, जन्म-मृत्यूचे रहाटगाडगे फिरत राहणार आहे तोपर्यंत अधिकाधिक जणांना ‘ बाबां ’ च्या कृपाप्रसादाची जास्तीत जास्त अनुभूती, प्रचिती अनुभविण्यास मिळणार आहे. अर्थात ‘ जैसा जैसा भावे, तैसा तैसा पावे ’ या उक्तीप्रमाणे त्या त्या प्रमाणात ! आणि हे सूर्यप्रकाशाइतकं स्पष्ट, त्रिकालाबाधीत सत्य असताना, ‘ साईनामाचा महिमा ’ हा लेख लिहिण्याचा आटापिटा कशाला असं मला लेखाचं शीर्षक लिहितानाच जाणवलं तरीदेखील ‘ साई ’ हा शब्द उच्चारताच मनात उठणारे भावतरंग, बाबांचे नाव घेताच हृदयावरचा भार हलका करणाऱ्या जाणीवा आणि दररोजच्या धकाधकीच्या धावपळीच्या जीवनातल्या दिसायला साध्यासुध्या, सोप्या वाटणाऱ्या अनेक फसव्या, गुंतागुंतीच्या व अचानक उद्‌भवणाऱ्या समस्या सहजगत्या उकलण्यासाठी वारंवार जीभेवर येणारे ‘ साईनाम ’ आणि त्यायोगे माझ्या अस्थिर दैनंदिन आयुष्याला आलेली स्थिरता, स्थैर्य लेखणीला थांबवू शकली नाही.

माझं ऑफीस साडेनऊचं ! पण ‘ आदतसे मजबूर ’ याप्रमाणे ठरवूनसुद्धा घरातून लवकर निघणं कधी होत नाही. मग काय आठ पस्तीसची ‘ विरार ’ पकडण्यासाठी घरातून निदान आठ पंचवीस–साडेआठला बाहेर पडून स्टेशनवर धाव घ्यावी लागते. तरीदेखील कधी घड्याळ पाठीमागे तर कधी ‘ शॉर्टकट ’ च्या रस्त्यामध्ये उभ्या असलेल्या मालगाड्या ह्या सवत्री आड येतात मग मात्र ‘ गाडी ’ चुकण्याची हमखास खात्री आणि नऊ पंचवीसला चर्चगेटला पोहचणारी ती गाडी चुकली तर ‘ मस्टर ’ वर भलामोठा ‘ रेड क्रॉस ’ मिळण्याची धास्ती. अशावेळी मला तारत कोण असेल तर ‘ साईनाम ! ’ तोंडानं ‘ साई वाचव रे मला ’ असं म्हणत, मनात साईनामाचा जप करीत स्टेशनवर पोहचावं तो ‘ गाडी ’ थोडीफार लेट असल्याचं समजतं आणि जीव भांड्यात पडतो आणि बरोबर वेळेवर ‘ मस्टर ’ गाठता येते. काहीवेळा ‘ लेट ’ होऊनही ‘ मस्टर ’ च्या बाबतीत अगदी स्ट्रीक्ट असणाऱ्या आमच्या ऑफीसमध्ये आमच्या नावापुढे ‘ रेड क्रॉस ’ करणारा ऑफीसर जागेवरच

नसतो. निदान आम्ही 'मस्टर साईन' करेपर्यंत तरी! हा साईनामाचा महिमा नाही-तर काय? धावती गाडी पकडण्याचा उपद्व्याप करण्याच्या नादात 'फूटबोर्डी' वर चढणे अशक्य झाल्यामुळे हातात आलेला गाडीच्या दरवाजातला दांडा सोडून देऊन गाडीच्या वेगाबरोबर फरफटत जाणाऱ्या वर्षाला प्लॅटफॉर्मवरच लोळण घेण्याची बुद्धी होते ती केवळ मनात सतत घोळणाऱ्या साईनामामुळेच! आणि हातापायांना थोडेफार खरचटण्यावरच निभावले जाते व तिला मृत्यूच्या दाढेतून– अपघाती मरणातून वाचविले जाते त्याचे कारण अर्थात एकच! आणि ते साकुरीच्या श्रीमती गोदावरी माताजींच्याच शब्दात सांगायचे तर--

'साईनाम तारक । चराचर व्यापक
वेता जाय पातक । जन्माचिया'

'श्रीसाई' या नावातून नादब्रह्म, आनंद उच्चारात अवतीर्ण झाल्यावर परंतून वैखरीत आल्यावर नामोच्चाराबरोबर नामी परमात्मा श्रीसाई साईराम प्रकट होतो व भक्तांवर कृपेचा वर्षाव करतो. मग मात्र गोदावरीमाताजींचे शब्द आम्हा साईभक्तांना पुरेपूर पटतात की,

'साईनाम कीर्ति । देशविदेश धरती
अस्तन पावे गभस्ति । ब्रम्हांडाचिया ॥'

'साईनामाचा महिमा अगाध आहे' ह्याविषयी आपलं स्वतःचं मतप्रदर्शन करताना आपल्या 'शिरडीचे साईबाबा' मध्ये डॉक्टर आण्णासाहेब गव्हाणकर म्हणतात की, आपल्या आजच्या कलीयुगात, असत्याच्या राज्यात हा भवसागर तरून जाण्याचं एकमेव साधन म्हणजे साईचं नामस्मरण! 'गोड तुझे नाम, आवडले मज । तुजे उच्चारिता, वाटतसे लाज' असं म्हणणाऱ्या तुकोबांना हे सांगायचं आहे. तर ज्ञानेश्वर महाराजसुद्धा 'वाचे नाम कीर्ति सर्वकाळ' यातून नामस्मरण हा संतधर्माचा आचार तर सदाचारणाचा विचार आहे ह्याशिवाय दुसरंतिसरं काहीच सांगत नाहीत.

मी तर म्हणेन की 'साईनाम' हे साईश्रद्धेचे उत्कृष्ट भोगस्थान आहे. कारण दाढदुखीनं बेजार, वेडापिसा झालेल्या मला रातोरात वेदनामुक्त करू शकलं ते फक्त साईनाम! हल्ली हल्ली अचानक उद्भवलेल्या जुलाब उलट्या (गॅस्ट्रो)नं त्रस्त झालेल्या माझ्या मातोश्रीला घरच्या घरी थोडाफार इलाज करून व्याधीमुक्त केलं गेलं ते तिनं, आम्ही मनोमन साईनामाचा जप केल्यामुळेच. परमुलुखात, परगावी असताना आधीव्याधी, भयभिती नष्ट करून मला निर्भय, निर्धास्त बनविले ते साईनामच!

माझ्या एखाद्या प्रसिद्ध झालेल्या कविता–कथेचे मानधन म्हणून पाच–पंधरा रुपये फक्त आलेले पाहताच मला प्रेमाने हिणविणाऱ्या माझ्या सौ. ला मी म्हटलं की 'बाबांनी आज पाच-पंधराच दिलेत. पण त्यांची इच्छा असली तर उद्या त्याचे पन्नास–पाचशेही होतील.' त्याबरोबर महिनाभरातच अनपेक्षितरित्या ऑफीसकडून मला 'गुड वर्क रिवॉर्ड' म्हणून नगद पाचशे रुपये मिळावेत हा 'साईनामाचा महिमा' नाही तर दुसरं काय ?...आणि असे साधेसुधे पण चमत्कार घडतात ते साईनामा-मुळेच. कारण साईनामाचा महिमाच तसा आहे. अनुपम्य, अतर्क्य, अतुलनीय ! फक्त ते नामस्मरण तुमच्या आमच्या अंतःकरणातून स्वयंस्फूर्तीनं, स्वयंप्रेरणेनं व्हायला हवं. आपोआप सहजगत्या ! मग मात्र प्रत्येकाला कळून येईलच येईल की—

'अमृताचि गोड शब्द एक 'साई'
दोन अक्षरात स्वर्गसुख देई...'


## — श्रीसाईलीला —

**सर्वांगसुंदर भव्य दिवाळी अंक १९७८**

श्रीसाईभक्तांना आलेल्या बाबांच्या विषयींच्या विविध अनुभवांनी भरगच्च असा छानदार अंक ऐन दिवाळीत थाटात प्रसिद्ध होणार

श्रीसाईभक्तांनी आपापले नवे, ताजे अनुभव कागदाच्या एकाच बाजूवर थोडक्यात सुवाच्च लिहून ते २० सप्टेंबर १९७८ पर्यंत संपादक श्रीसाईलीला, साईनिकेतन, ८०४ बी. डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई ४०००१४ या पत्त्यावर पाठवावेत. वरील तारखेनंतर आलेल्या कोणत्याही मजकुराचा स्वीकार करता येणार नाही.

**मुखपृष्ठावर बाबांचे मोहक चित्र** **किंमत सव्वा रुपया**

# योगेश्वर–भगवान श्रीकृष्णाची जन्म कुंडली

— होरालंकार श्री. शं. दा. देवधर
७।३७ अहमद सेलर बिल्डिंग,
दादर, मुं. १४






● महाभारताचे नायक, भगवद्गीतेचे उद्‌गाते योगेश्वर भगवान श्रीकृष्ण, सर्वतोमुखी असलेले हिंदूंचे आवडते दैवत आहे. भारतातच नव्हे तर अमेरिकेतही त्यांचे उपासक आहेत. त्यांची प्रसिद्ध असलेली कुंडली वर दिली आहे.

जन्म वृषभ लग्नावर झालेला आहे. चंद्र वृषभ ह्या चंद्राच्या उच्च राशीस आहे. ही स्थिर आणि पृथ्वीराशी आहे. दीर्घोद्योगी उत्कृष्ट व्यवहारज्ञानी, स्थिर बुद्धी असलेला, चलाख, चिकाटी व दृढनिश्चय अंगी असलेला सौंदर्याचा शौकी असा वृषभेचा स्वभाव आहे. सौंदर्याचा कारक शुक्र या राशीचा स्वामी. लग्नावर शनीची दृष्टी. लग्नेश शुक्र मंगळाच्या युतीत म्हणून मंगळ, चंद्र, शुक्र, शनि यांचा परिणाम श्रीकृष्णाच्या व्यक्तिमत्वावर झाला आहे. तो अत्यंत मोहक, आकर्षक व गोंडस रूप घेऊन जन्माला आला. पोवळ्यासारखे ओठ, गोबरे गोबरे गाल, पाणीदार नेत्र, डौलदार प्रमाणबद्ध शरीर, मेघश्यामल कोमलांग यामुळे हा मोहन सर्वांना भुरळ घालणारा होता. गोपींच्या ध्यानी मनी स्वप्नी बालमोहन नाचत होता. ॥ अधरम् मधुरम् , वदनम् मधुरम् , वचनम् मधुरम् , मधुराधिपते रखिलं मधुरम् ॥ असे कवी वर्णन आहे.

धनेश बुध पंचमात उच्च, पंचम, नवम ही संपत्तीस्थाने. त्यांचे स्वामी बलवान. यामुळे श्रीकृष्ण अफाट संपत्ती व राज्ये यांचा स्वामी होता. वक्तृत्वाचा कारक बुध पंचमात उच्च. पंचम या बुद्धीस्थानी म्हणून अलौकिक वक्तृत्व व वाक्‌पटुत्व अनेक

प्रसंगानी सिद्ध झाले. कुरुक्षेत्राच्या युद्धभूमीवर ऐन युद्धाच्या वेळी गलितगात्र झालेल्या अर्जुनाला केलेला उपदेश भगवद्गीतेच्या रुपाने अजरामर आहे.

तृतीयस्थानी कर्क या नीच राशीत मंगळ व तृतियेश चंद्र उच्च हा नीचभंग राजयोग व चंद्र-मंगळ परिवर्तन योग आहे. याचे फळ असामान्य धैर्य, शौर्य साहस व पराक्रम यांचा द्योतक हा योग आहे. कंस चाणूरासारख्या मदोन्मत्त कर्दनकाळाचा त्याने चुराडा केला. कालिया नागाचा नक्षा उतरवला. कौरव-पांडवांच्या महा-युद्धात पांडवांना अंतिम विजय प्राप्त करून दिला. हा शक्ति-युक्ति म्हणजे चंद्र-मंगळ परिवर्तन योगाचा परिणाम आहे. तृतीय स्थान हे भावंडांचे स्थान, तेथे नीच मंगळ व तो व्ययेश असल्याने श्रीकृष्णाची सात भावंडे कंसाने ठार मारली.

चतुर्थस्थानी चतुर्थेश रवि बलवान व बुद्धीचा कारक बुध पंचमात उच्च त्यामुळे असामान्य बुद्धिमत्ता व चौदा विद्या आणि चौसष्ट कला अवघ्या चौसष्ट दिवसात आत्मसात करण्याची कुवत दिसून येते. उपनिषदे, वेद, न्यायशास्त्र, तर्कशास्त्र व धनुर्विद्या त्याच्या हातचा मळ होता. । सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनंदनः। रवि बलवान, चंद्र बलवान असल्याने मातृसौख्य दीर्घकाळ लाभले व गृहसौख्य उत्तम मिळाले.

पंचमेश बुध पंचमात उच्च. हे संततीस्थान असल्याने कृष्णाला पुष्कळ मुलगे होते.

षष्ठेश शुक्र तृतियस्थानी असल्याने भावंडाचा नाश, व मामा हाच शत्रू. तृति-यातील मंगळाची षष्ठस्थानावर दृष्टी असल्याने शत्रूचा नाश.

सप्तमेश मंगळ तृतियस्थानी व शुक्राने युक्त त्यामुळे श्रीकृष्णाला हजारो स्त्रिया होत्या.

अष्टमेश गुरु चतुर्थात, रविने युक्त व रवि-चंद्र-शनि बलवान त्यामुळे दीर्घायुष्य लाभले. श्रीकृष्णाला १२५ वर्षे आयुष्य लाभले होते.

नवमेश शनि केंद्रात बलवान, पितृकारक रवि केंद्रात स्वगृही त्यामुळे पितृ-सौख्य दीर्घकाळ. नवमस्थान हे धर्मस्थान व धर्मेश शनिची गुरूवर दृष्टी म्हणून कुरु-क्षेत्राच्या युद्धभूमीवर ऐन युद्धाचे वेळी अर्जुनाला केलेला धर्माचा उपदेश. भगवद्गीतेच्या रूपाने अजरामर आहे. भगवान श्रीकृष्णाची कीर्ति आजतागायत लोकांमध्ये जागृत आहे.

प्रसंगानी सिद्ध झाले. कुरुक्षेत्राच्या युद्धभूमीवर ऐन युद्धाच्या वेळी गलितगात्र झालेल्या अर्जुनाला केलेला उपदेश भगवद्गीतेच्या रुपाने अजरामर आहे.

तृतीयस्थानी कर्क या नीच राशीत मंगळ व तृतियेश चंद्र उच्च हा नीचभंग राजयोग व चंद्र-मंगळ परिवर्तन योग आहे. याचे फळ असामान्य धैर्य, शौर्य साहस व पराक्रम यांचा द्योतक हा योग आहे. कंस चाणूरासारख्या मदोन्मत्त कर्दनकाळाचा त्याने चुराडा केला. कालिया नागाचा नक्षा उतरवला. कौरव-पांडवांच्या महा-युद्धात पांडवांना अंतिम विजय प्राप्त करून दिला. हा शक्ति-युक्ति म्हणजे चंद्र-मंगळ परिवर्तन योगाचा परिणाम आहे. तृतीय स्थान हे भावंडांचे स्थान, तेथे नीच मंगळ व तो व्ययेश असल्याने श्रीकृष्णाची सात भावंडे कंसाने ठार मारली.

चतुर्थस्थानी चतुर्थेश रवि बलवान व बुद्धीचा कारक बुध पंचमात उच्च त्यामुळे असामान्य बुद्धिमत्ता व चौदा विद्या आणि चौसष्ट कला अवघ्या चौसष्ट दिवसात आत्मसात करण्याची कुवत दिसून येते. उपनिषदे, वेद, न्यायशास्त्र, तर्कशास्त्र व धनुर्विद्या त्याच्या हातचा मळ होता. । सर्वोपनिषदो गावो दोग्धा गोपालनंदनः। रवि बलवान, चंद्र बलवान असल्याने मातृसौख्य दीर्घकाळ लाभले व गृहसौख्य उत्तम मिळाले.

पंचमेश बुध पंचमात उच्च. हे संततीस्थान असल्याने कृष्णाला पुष्कळ मुलगे होते.

षष्ठेश शुक्र तृतियस्थानी असल्याने भावंडांचा नाश, व मामा हाच शत्रू. तृति-यातील मंगळाची षष्ठस्थानावर दृष्टी असल्याने शत्रूचा नाश.

सप्तमेश मंगळ तृतियस्थानी व शुक्राने युक्त त्यामुळे श्रीकृष्णाला हजारो स्त्रिया होत्या.

अष्टमेश गुरु चतुर्थात, रविने युक्त व रवि-चंद्र-शनि बलवान त्यामुळे दीर्घायुष्य लाभले. श्रीकृष्णाला १२५ वर्षे आयुष्य लाभले होते.

नवमेश शनि केंद्रात बलवान, पितृकारक रवि केंद्रात स्वगृही त्यामुळे पितृ-सौख्य दीर्घकाळ. नवमस्थान हे धर्मस्थान व धर्मेश शनिची गुरूवर दृष्टी म्हणून कुरु-क्षेत्राच्या युद्धभूमीवर ऐन युद्धाचे वेळी अर्जुनाला केलेला धर्माचा उपदेश. भगवद्गीतेच्या रूपाने अजरामर आहे. भगवान श्रीकृष्णाची कीर्ति आजतागायत लोकांमध्ये जागृत आहे.

दशमेश शनि तीक्ष नवमेश केंद्रात, (सप्तमात) त्याची रवि, गुरु यांच्यावर दृष्टी हा राजयोग आहे. भगवान श्रीकृष्ण कुशल राजनीतीज्ञ, बुद्धिमान, मुत्सद्दी व व महान राजधुरंधर होता. त्याने अनेक राज्ये स्थापन केली. गरीब, दीन लोकांना सहाय्य केले. महाभारताचा तो महान नेता होता. वेळप्रसंगी कपटनीतीचा अवलंबही त्याने केला. शिखंडीला पुढे करून भीष्माचार्यांचा, खोटी बातमी उठवून द्रोणाचार्यांचा, कृत्रिम सूर्यास्त करून जयद्रथाचा त्याने वध करविला. या सर्व कपटनीतीचे कारण शनिची दहावी दृष्टी रवि, गुरूवर.

लाभेश गुरु चतुर्थात त्यामुळे अनेक प्रकारचे लाभ झाले. त्याने अनेक राज्ये स्थापन केली व अनेकाना महत्पदाला चढविले.

व्ययेश मंगळ तृतियस्थानी. तृतियस्थान हे भावंडाचे स्थान. त्यामुळे श्रीकृष्णाची सात भावंडे त्याच्या मामाने (कंसाने) ठार मारली. षष्ठेश शुक्र ही मंगळाच्या युतीत आहे. त्यामुळे मामा हाच शत्रू झाला.

श्रीकृष्णाच्या कुंडलीतील श्रेष्ठ प्रकारचे योग—

१) चंद्र वृषभ ह्या उच्च राशीत
२) रवि सिंह स्वराशीत
३) बुध कन्या ह्या उच्च राशीत व शिवाय पंचमात
४) चंद्र-शुक्र परिवर्तन योग
५) शनि-रवि राजयोग. (शनिची रविवर दृष्टी) शनि भाग्येश व रवि चतुर्थेश
६) भाग्येश शनिची लाभेश गुरूवर दृष्टी हा महायोग
७) चतुर्थेश चतुर्थात, पंचमेश पंचमात राजयोग

वरील सर्व योगांमुळे भगवान श्रीकृष्ण दीर्घायु, असामान्य बुद्धिमान, तत्त्वज्ञानी, राजकारणी, अजिंक्य योद्धा, शरणागत, वत्सल म्हणून पूर्णावतार होऊन गेला.

। कृष्णम् वंदे जगद्गुरुम् ।

********

# ....श्रीबाबांच्या पोथीचे सामर्थ्य....

—डॉ. सुमन ल. खानविलकर
'सीता–कुंज', लोणावळा

● तीस वर्षांपूर्वीची गोष्ट. माझे पती कंपनीच्या कामासाठी मधूनमधून वालचंद-नगरला जात असत. त्यावेळी आम्ही मुंबईत रहात होतो. घरात दोन लहान मुले व मी. मुले लहान असल्यामुळे मला कोठेच जाता येत नसे.

मला नेहमी वाटायचे की आपण बाबांची पूजा करतो, त्यांचे स्तोत्र वाचतो परंतु त्यांची मोठी पोथी की ज्याच्यामध्ये त्यांचे संपूर्ण चरित्र आहे, ते आपणास वाचण्यास मिळाले तर किती बरे होईल पण तसा योग आला नव्हता.

परंतु पुढील घटनेतून माझ्या पतींना मृत्यूच्या दाढेतून सोडविण्याचे होते म्हणूनच मला आमच्या शेजारच्या आजोबांकडे काहीतरी देवाचे पुस्तक वाचण्यास द्या असे म्हणण्याची बुद्धी झाली. तेव्हा त्यांनी मला सांगितले की माझेकडे साईचरित्र ही पोथी आहे ती पाहिजे तर घेऊन जा.

मी लगेच होय म्हटले. माझ्या मनात आले, बाबा कसे कळले हो तुम्हाला की मला तुमचे चरित्र वाचण्याची मनापासून इच्छा झाली आहे व तो हेतू आपण पुरा करावा ! मी इतक्या आतुरतेने व आनंदाने होय म्हटले ते पाहून ते माझ्याकडे आश्चर्याने पहातच राहिले. मी त्यांना माझ्या मनातले सांगितले. त्यांनासुद्धा बरे वाटले. पोथी घेऊन मी घरी आले.

लगेच आंघोळ केली व पोथी वाचण्यास सुरवात केली. मनाला क्षणाक्षणाला आनंदाचे उमाळे येऊ लागले. रात्री एक दीडच्या सुमाराला वाचन बंद केले व झोपले. पहाटे चारच्या सुमाराला उठून आंघोळ करून पूजा केली व वाचायला बसले तिसऱ्या दिवशी संध्याकाळी पोथी वाचून झाली.

झुणका भाकर व शिरा केला. नैवेद्य दाखविला. इतक्यात दारात माझे पती आलेले पाहिले. जरा आश्चर्यच वाटले. कारण आणखी चार दिवसानंतर येणारे आज कसे ! पण बरे वाटले. प्रसादाचे जेवण त्यांना पण मिळाले.

पण पहाते तर त्यांचे तोंड उतरलेले. तोंडावर काळे निळे डाग. मग मात्र घाबरूनच गेले मी. त्यांना विचारले, हे काय ? तेव्हा त्यांनी सांगितले :

वालचंदनगरच्या थोड्या अंतरावर आमचा ट्रक असताना एकदम काय होते हे कळण्याच्या आधीच गाडी काळोखातून पुलाच्या खाली कोसळली. आम्ही

जगण्याची आशाच सोडली होती. नंतर खूप वेळाने लक्षात आले आपण कोठेतरी अडचणीत आहोत व पाण्यात असल्यामुळे आपणाला थंडी वाजते आहे. प्रत्येकाने बाहेर निघण्याची खटपट सुरू केली. गाडीत पिंपे असल्यामुळे उलटलेला ट्रक व पिंपे यांच्या मध्ये थोडी थोडी पोकळी होती. त्यातून हे व आणखी दोघे सरपटत सरपटत त्या गाडीच्या बाहेर आले परंतु बाहेर आल्यावर आपण कोठे आहोत काहीच समजेना कारण सगळीकडे अंधार पसरलेला. थोडा पहाटेचा वेळ झाल्यावर इकडे तिकडे पहाण्यास सुरवात केली कारण एकतर भिजलेले व त्यात पहाटेचा गार वारा. कोठे गरम गरम चहा मिळतो का मिळाला तर किती बरे वाटेल पण जेथे कोणाचा आवाज नाही की एकादी जवळ पास झोपडी पण नाही. पण बाबांनी जास्त अंत पाहिला नाही. तेथील जवळपास रहाणारा कोणी शेतकरी होता त्याने पाहिले व लगेच या लोकांना घरून चहा गरम गरम आणून दिला. शेकोटी करून दिली. मग सर्वांना खूप बरे वाटले. त्यानेच यांना पूलावर लंगडत लंगडत आणून दुसऱ्या ट्रकमध्ये बसवून मुंबईला पाठविले. सर्व अंगाला मुका मार लागला होता.

त्यानंतर औषधोपचार करून दहा बारा दिवसानी त्यांना बरे वाटले.

यावेळी ते बाहेरगावी गेले तेव्हापासूनच मला चैन पडत नव्हती. मनात उगाचच बैचेनी निर्माण झाली होती. म्हणूनच पुस्तक मागण्याची इच्छा झाली होती व पुस्तकाऐवजी पोथीच हातात आली.

असे आहे श्रीबाबांचेच नव्हे तर त्यांच्या पोथीचेहुद्धा सामर्थ्य ! किती प्रेमळ आहेत आपले बाबा माय माऊलीच्या प्रेमाने मला संकट येणार आहे. सावध रहा असाच इशारा दिला व लगेच संकट निवारणार्थ उपायपण सांगितला. कसे या बाबांच्या प्रेमाचे वर्णन करू. अंतःकरण भरून येते व तोंडातून फक्त निघते ते

॥ श्रीसाईबाबा कृपावंता नमो नमः ॥

---

मंदिरचालकांनो, आपापल्या साईमंदिरातील श्रीसाईमूर्तींची छायाचित्रे १५ ऑक्टोबर ७८ पर्यंत प्रदर्शनासाठी पाठवा.

चित्रांची लांबी १० इंच रुंदी ८ इंच.

संपादक श्रीसाईलीला, साईनिकेतन, दादर, मुंबई १४.

# " अशी आहे श्रीसाईलीला "

– श्री. प. अ. जाम्भळांडेकर
१११२ 'ई', शाहुपुरी, कोल्हापूर

● मी १९५१ पासून साई भक्ती करतो. १९५१ मध्ये मी नगरला गेलो होतो, तेथे काम झाले नाही म्हणून आम्ही निराश होऊन परत येण्यास निघालो. पण तेथील एक प्रतिष्ठित कापड व्यापारी यांनी आज मुक्काम करून, उद्या शिर्डीस जाऊन मगच कोल्हापूरला जा असा आग्रह धरला. त्याप्रमाणे मुक्काम करून दुसरे दिवशी सकाळी उठून आम्ही ८ वाजता निरोप घेतला. आम्ही बारा वाजता शिर्डीस पोहोचलो. स्नान करावयाचे होते, पण विहिरीवरील इंजिन एक मिनिट झाले होते बंद करून. नोकर दार बंद करण्याच्या बेतात होता. मी त्यास विनंती केली व लांबून आलो आहे व आंघोळीस पाच मिनिटे मशीन चालू केल्यास उपकार होतील असे सांगितले. काय कुणास ठाऊक त्याने आमच्या विनंतीस मान दिला. त्याने सांगितले लावडतोच स्नानगृहात जा. त्याचे आम्हावर प्रथमच मोठे उपकार झाले. त्यानंतर त्याचे आभार मानून आम्ही देवदर्शनाकरिता गेलो. आम्ही चार-पाच लोक होतो. त्या सर्वांनी हार, नारळ, ऊद वगैरे सर्व काही भरगच्च प्रसाद घेतला व दर्शनास श्री-चरणी गेलो. तो काय पुजा–आरतीचा लाभ मिळाला. सर्व काही शांतपणे कार्यक्रम पार पडले. मग भोजन केले. थोडी विश्रांती देवळातच घेतली. त्या गार गाभाऱ्यात शांत डोके होऊन, विचारसरणीत बदल होत आहे असे मला वाटले व कितीतरीवेळ मी बाबांच्या मूर्तीकडे पहात राहिलो व त्यांच्याबद्दल मला एक प्रकारचा आदर व विश्वास निर्माण झाला.

तेथून ४ वाजता निघालो ते पुण्यास रात्री नऊ वाजता पोहचलो. पुण्यात जेवण घेतले व कोठेतरी हॉटेल पहावे व राहून उद्या सकाळी जावे, असे माझे ठरले. पण माझे मित्र म्हणाले, आपण जावयाचे कशाला थांबायचे १।२ ला कोल्हापूरला पोहचू, असे करत निघण्याचे ठरले. रात्री ११ वाजता पुणा सोडले. साताऱ्यात १२–३० वाजता पोहोचलो. तेथे कॅन्टीनमध्ये चहा घेतला व पुढे कऱ्हाड रस्त्यावर दुतर्फा झाडी लागते, त्या ठिकाणी सर्व रस्ता दगडानी अडविलेला दिसला. मला तर घामच फुटला, गाडीला वेग ८० मैलाचा होता. मित्र घाबरले व ओरडले, मी त्यांना साईबाबांचे नाव घ्या, घाबरू नका, आणि काय आश्चर्य गाडी भरधाव, अक्षरशः दगड सुरूंगाचा दगड जसा उडतो त्याप्रमाणे वेगाने गेली व आम्ही सहीसलामत सुटलो. आम्ही पाठीमागे वळून पाहिले, तो ८।१० लोक

काट्या घेऊन, गाडीवर दगड फेकून ओरडत होते. आम्हास हा पहिला अनुभव आज तारखेपर्यंत आठवितो आहे. कारण तो महिनाही एप्रिलचा होता. चांदणे शुभ्र होते, कसेतरी कऱ्हाडला हॉटेल पाहून गाडी ३ वाजता थांबविली. स्पेशल चहा; फराळास सांगून, गाडीत गप्पा मारत बसलो. वेळ आली होती, पण बाबांचे कृपेने टळलो. हा मंत्र सर्वांना कोल्हापूरला पोहचलो तरी चालू होता व आम्ही कधी भेटलो तरी वधोतुरपे बाबांनी मार्गातील अडथळा दूर केलेल्याची आठवण आम्हा सर्वांचे मनातून जात नाही, ही साईलीलाच म्हणावी.

दुसरा एक प्रसंग असाच. १९५४ जूनमधील, गोव्याहून मी व माझी सौभाग्यवती व मुले येत होतो. रात्रीची वेळ ११ ची होती. खानापूरचे भयंकर जंगल, रात्र काळोखी होती, पाऊस रिरघिर पडत होता. गाडीचा रस्ता पावसामुळे चुकला व गाडी मातीत रुतली. मी पुष्कळ प्रयत्न केले, पण गाडी रुतून चाके तेथले तेथेच फिरत, पाऊस धड मोठा नाही व रेनकोट व छत्रीचा काहीच उपयोग होईना. शेवटी स्वस्थ बसून राहिलो, गाडीला सर्चलाईट होता. त्याने लाईट पाडून, कोण दिसते काय पाहिले, पण कोणी मनुष्य अगर प्राणीसुद्धा दिसला नाही. साईबाबांचे नाव घेतले, तोच धनगररुपाने साईबाबा आले व माझेशी बोलले 'काय झालंय?' मी म्हटलं गाडी रुतली आहे व लहान मुले आहेत, त्यामुळे मदतीस कोणी तरी यावे म्हणून लाईट लावली आहे. चल गाडी चालू कर, मी धक्का देतो, सरळ रस्ता आहे, वाकडा जाऊ नकोस, आणि काय आश्चर्य! गाडीला धनगराचा हात लागला. तो गाडी टुणदिशी उडाली व शेवटी रस्त्यावर आली, असा काय आनंद झाला की आम्ही गाडी रस्त्यावर उभी करून पाहू लागलो. सर्चलाईटचे उजेडात धनगर कोठेच दिसेनासा झाला व प्रथम ज्यावेळी गाडीजवळ आलेला धनगर पाहिला त्यावेळी त्याचा चेहरा व बाबांचा चेहरा पाहिला तर बाबाच नक्की होते, त्यांची आठवण सदैव माझे स्मरणात आहे व ती तेवत ठेवली आहे.

बाबांचे नामस्मरणाने माझी अनेक कामे दूर झाली आहेत व होत आहेत.

*

# ....प्रार्थना....

संग्राहक :- कु. **मनोज रमेश चव्हाण**
साईनिकेतन, (दुसरा मजला)
गुजरलेन, नवापूर जि. धुळे

[ जगातील निरनिराळे तत्वज्ञानी प्रार्थनेसंबंधी काय म्हणतात वाचा तर खरं ! ]

- ईश्वराने कबूल केलेल्या वस्तूंच्या प्राप्तीसाठी अंतःकरणपूर्वक प्रेमाने ईश्वरास आळविणे, म्हणजेच प्रार्थना.

—डनियल

- प्रार्थना म्हणजे विशिष्ट विचारांचे चिंतन ! आयुष्यात असे काही क्षण येतात की, देहाची प्रवृत्ती काहीही असली तरी मन हे प्रार्थनेकडे ओढ घेते.

—व्हिक्टर ह्युगो

- प्रार्थना म्हणजे वक्तृत्व नव्हे, तर मनाची आर्तता ! प्रार्थना म्हणजे शब्दावडंबर नव्हे, तर अंतःकरणाची तळमळ !

—एच. मूर

- प्रार्थनेची साधी व सुटसुटीत व्याख्या म्हणजे मनाला ईश्वराच्या बाजूने वळण लावणे.

—फिलिप्स ब्रुक्स

- परमेश्वराची प्रार्थना म्हणजे धर्म आणि नीतितत्त्वे यांची मिळवणूक.

—वेलिंग्टन

- ईश्वरावर आत्यंतिक प्रेम करणे, हीच सर्वोत्कृष्ट प्रार्थना.

—कोलेरीज

- सहनाभ्यास हीच सर्वात मोठी प्रार्थना.

—भगवान बुद्ध

- प्रार्थना म्हणजे सत्याचा शोध करणे, अव्यक्त अनंतात लीन होणे, नव्हे काय? मनापासून प्रार्थना करणारास प्रार्थनेपासून काही ना काही तरी ज्ञान प्राप्त झालेच पाहिजे.

—इमर्सन

- प्रार्थना म्हणजे सर्व मोहापासून परावृत्त करणारा सद्‌गुण.

—बरनार्ड

● अंतःकरणाच्या गुप्त इच्छा प्रार्थनेत प्रकट होतात.

—रेक्स

● जेवढे शब्द मोजके, तेवढी प्रार्थना उत्तम.

—ल्युथर

● ईश्वर आपल्यापासून फार दूर रहातो. परंतु प्रार्थना ईश्वरास आपल्याजवळ खेचून आणते, आणि त्याच्या शक्तीची व आपल्या यत्नांची जोड घालून देते.

—मदाम द गॅस्पीरीन

● तुमची प्रार्थना किती वक्तृत्वपूर्ण आहे, याकडे ईश्वराचे लक्ष नसते; तुम्ही किती दीर्घकाळपर्यंत प्रार्थना करता यालाहि ईश्वर महत्त्व देत नाही; तुम्ही किती वेळा प्रार्थना करता याचीहि ईश्वर क्षिती बाळगीत नाही; तुमची प्रार्थना कशी पद्धतशीर असते याजकडेहि ईश्वर पहात नाही. तर तुम्ही किती मनापासून प्रार्थना करता यालाच फक्त ईश्वर किंमत देतो!

—ब्रूक्स

● आपण ईश्वराची प्रार्थना करताना 'माझे कल्याण कर!' 'मला अमुक दे, तमुक दे' असे ईश्वराजवळ मागू नये. आपणास काय हवे, हे ईश्वरास चांगले कळते.

—सॉक्रेटीस

● त्रास व संकटे मला प्रार्थनेकडे पळवितात व प्रार्थना, त्रास आणि संकटांना पळवून लावते.

—मेलॅन्कथॉन

● जगाच्या उत्पत्तीपासून आतापर्यंत झालेल्या सर्व मेजवान्या झोडून जेवढे सुख मिळेल, त्यापेक्षा अनंतपटीनी सुखाचा अनुभव तासाभराच्या छोट्या प्रार्थनेत मिळेल!

—वेर्ली

● आपली प्रार्थना व ईश्वराची कृपा विहिरीतील दोन पोहऱ्यासारखी आहेत. एक पोहरा वर आला की, दुसरा पोहरा खाली जातो!

—हॉपकिन्स

★

# ....श्रीसाईबाबांचा प्रभाव....

–श्री. सदाशिव गणपत कुलकर्णी

● साईबाबा समाधिस्थ होऊन आज ५० वर्षे झाली. पण वेळोवेळी ते आपल्या भक्तांसाठी धावत येऊन त्यांचे संकट, मग ते कोणत्याही प्रकारचे असो, दूर करतात. मात्र भक्ताने त्यांना अनन्य भावाने शरण गेले पाहिजे.

मद्रास प्रांतात वेन्ड्राप्रागडा म्हणून एक खेडेगाव आहे. तेथे नागाभाईराव वेंकटरत्नम् चौधरी नावाचे एक तेलगू सुखवस्तू गृहस्थ रहातात. त्यांचे वय सध्या ७५ वर्षाचे आहे.

१९३७ सालातील गोष्ट. त्यावेळेस हे गृहस्थ अत्यंत चिंतेत होते. त्यांची बायको सुमारे वर्षभर खरजेसारख्या रोगाने ( Eruption all over body ) आजारी होती. सर्व उपचार झाले पण गुण येत नव्हता. त्यांच्या वडिलभावाचा मुलगा चार वर्षे कफक्षयाने आजारी होता. त्याचेकरिता सर्व वैद्यकीय व डॉक्टरी उपाय केले. पण दिवसेंदिवस त्याचा आजार वाढतच गेला. देवदेवस्की मंत्र, तंत्र इत्यादी सर्व उपाय झाले पण गुण नाही. शेवटी परमेश्वरावर सर्व भार टाकून ते स्वस्थ बसले. अशा रीतीने ते परमेश्वरास अनन्य भावाने शरण गेल्यामुळे व त्यांचेवरच विसंबून राहिल्यामुळे परमेश्वर स्वरूप श्रीसाईबाबास त्यांचे सहाय्यास धावून जाणे भाग पडले. त्याच गावात श्री. रामराव या नावाचे एक शाळामास्तर होते. ते आपणहून वरील गृहस्थास भेटले व त्यांनी नागाभाईरावांना श्रीसाईबाबांचा फोटो देऊन त्याची पूजा करण्यास सांगितले. फोटो पाहताच श्री. नागाभाईरावांचे मन एकदम प्रसन्न झाले व आपल्या शिरावरील एक मोठे दडपण दूर झाल्याचा भास झाला. श्रीसाईबाबांची ते त्रिकाळ पूजा करू लागले. श्री. ए. रामराव ह्यांनी नागाभाईरावांना बाबांची उदी दिलीच होती. ती ते रोज आपल्या पुतण्यास देऊ लागले. तसेच 'श्रीसाईबाबा' 'श्रीसाईबाबा' हे नाव एकसारखे कागदावर लिहू लागले. श्री. ए. रामराव यांनी दिलेली उदी संपल्यावर ते ती श्रीसाईबाबा शिर्डी संस्थानकडून मागवून घेऊ लागले.

थोड्याच दिवसात त्यांची बायको तर पूर्ण बरी झालीच. पण अवघ्या सहा महिन्यात त्यांचा पुतण्या जो क्षयरोगाने मरणाच्या दारी पडला होता तोही खडखडीत बरा झाला. आता श्री. नागाभाईरावांना शिरडीस जाऊन श्रीसाईबाबांच्या समाधीचे

दर्शन घेण्याची तीव्र इच्छा निर्माण झाली. त्यांना अद्याप (सन १९३७ सालापर्यंत) मूल नव्हते व त्यावेळेस त्यांचे लग्नास २०–२२ वर्षे होऊन गेली होती. तेव्हा आपली ही पण इच्छा बाबा पूर्ण करतील याची त्यांना खात्री वाटू लागली. पण काही ना काही अडचणी येत राहून त्यांचे शिरडीस जाणे लांबणीवर पडले. शेवटी तो योग १९४१ मध्ये आला. त्यावेळेस (जानेवारी १९४१) ते सहकुटुंब शिर्डीस आले. कोपरगाव स्टेशनवर ते रात्रीच उतरले पण शिर्डीस जाण्यास मोटार नसल्यामुळे ते स्टेशनवरच झोपले. त्या रात्री त्यांना स्वप्न पडले. स्वप्नात त्यांनी श्रीसाईबाबांची समाधी पाहिली. हा एक शुभशकुनच होय असे त्यांस वाटले. नंतर ते शिर्डीस आले. संध्याकाळी श्रीसाईबाबा ज्या निंबवृक्षाखाली बसत असत त्या वृक्षाची थोडीशी पाने प्रसाद म्हणून घेण्याकरता तोडीत असता एका मधमाशीने त्यांचे पोटावर डंख मारून चावा घेतला तेव्हा त्यांस फार वेदना होऊ लागल्या. त्यावेळी अखिल भारतीय साईसमाजाचे अध्यक्ष श्री. बी. व्ही. नरसिंहस्वामी हे तेथेच होते. त्यांनी लगेच आपल्या जवळची श्रींची उदी नागाभाईरावांचे पोटास लावली व म्हणाले, सर्व पापांचा क्षय झाला. तुमची इच्छा पूर्ण होईल. नागाभाईराव लगेच पुन्हा समाधी-मंदिरात गेले व समाधीचे दर्शन घेऊन आपणास मूल व्हावे. (मग ते मुलगा असो वा मुलगी असो) अशी श्रींचे चरणाजवळ प्रार्थना केली. त्याच रात्री ते धर्मशाळे-तील आपल्या खोलीत झोपले असता त्यांना एक स्वप्न पडले. स्वप्नात त्यांना एका ब्राह्मणाने मूल दिल्याचे व त्या मुलाने त्यांचे अंगावर लघवी केल्याचे दृश्य पाहिले. दुसरे दिवशी संध्याकाळी ते आपल्या घरी गेले. अनन्यभावाने शरण आलेल्या भक्तांच्या मनोकामना पुरविणे हे तर श्रीसाईबाबांचे ब्रीदच आहे. घरी परत जाताच सुमारे एक महिन्यातच घरात मूल खेळू लागेल अशी चिन्हे दिसू लागली व यथा-योग्य काळी त्यांचे कुटुंब प्रसूत होऊन त्यास कन्या प्राप्ती झाली. (ता. १६–९–१९४१) श्रीसाईबाबांच्या कृपेचा हा प्रसाद होय. मुलीचे नाव '**श्रीसाईप्रसादिनी**' असे ठेवले. श्रीसाई सगुणोपासना, स्तवन वगैरे पुस्तकांचे तेलगूत भाषांतर करून श्री. नागाभाईरावांनी श्रीसाईबाबांचा प्रचार त्या बाजूस त्यांनी बराच केला आहे. शिवाय श्रीसाईबाबांचे एक मंदिरही त्यांनी आपल्या वेन्ट्राप्रागडा गावी बांधले आहे.

# श्री. सदाशिव दिगंबर उर्फ दाजीसाहेब जोशी

# भक्त मंडळींचे विविध अनुभव

श्री. सदाशिव दिगंबर उर्फ दाजीसाहेब जोशी यांचा परिचय आम्ही श्रीसाईलीला एप्रिल १९७८ चे अंकात प्रसिद्ध केला होता. त्यांचा परिचय वाचून असंख्य साईभक्त मंडळींची त्यांच्याकडे अक्षरशः रीघ लागली. या सुविध दाजीसाहेबांना आपल्या कार्यात श्री. गुळवणी महाराज, श्री. काणे महाराज, श्री. बालचंद्र महाराज, श्री. गगनगडकर महाराज इ. चे शुभाशिर्वाद लाभलेले आहेत तसेच जोशीसाहेब लहान असताना, शिक्षण घेत असताना त्यांना वसईचे डॉ. बर्वे यांची भावजय श्रीमती इंदुमतीविष्णुपंत बर्वे यांचे सहकार्य लाभले आहे. श्री. जोशी श्रीमती बर्वेंना आपली धर्ममातोश्री म्हणून मानतात. तिनेच त्यांना जग दाखविले, तिनेच त्यांना वसईच्या न्यू इंग्लिश स्कूलमधे पाचवी ते मॅट्रिकपर्यंतचे शिक्षण दिले. याचा ऋणनिर्देश जोशीसाहेब करतात. श्रीमती बर्वे यांचेप्रमाणेच वसईचे कुमारदादा शिलोत्री यांचाही उल्लेख ते करतात. विवाहानंतर आपल्या पत्नी सौ. सुगंधा यांचेही त्यांना आपल्या कार्यात उत्तम प्रकारे सहकार्य लाभत आहे. रात्री बाराबारा वाजेतोपर्यंत त्या आपल्याकडे येणाऱ्या स्त्री-पुरुष भक्तमंडळींचे स्वागत करतात. त्यांचा धाकटा मुलगा प्रफुल्ल हा पण दर मंगळवारी सेवा करतो. श्री. दाजींच्याकडे जाऊन फायदा झालेल्या मंडळीचे काही अनुभव—

१) श्रीदेवीच्या व श्रीबाबांच्या कृपेने श्री. सप्रे यांची ४१ दिवस बेशुद्ध असलेली मुलगी शुद्धीवर येऊन बरी झाली आहे.

२) श्री. नानासाहेब बर्वे यांच्या पत्नीचा हात अक्षरशः बरा झाला. अनेक डॉक्टरी उपाय केले पण हाताची सूज काढतच नव्हती. हात कापावा लागला असता पण दाजींचा परिचय होऊन त्यांच्या उपायाने हात पूर्ववत झाला. भायखळा रेल्वे कॉलनीत श्री. बर्वे ऑफिसर आहेत.

३) सात वर्षे डोके दुखत असलेली एक महिला दुखण्यातून बरी झाली.

४) श्री. दाजींच्या घराण्याचे पणजोबांच्या वेळेपासूनचे घराणे व पिढीजात जिव्हाळ्याचे व त्यांच्या मातोश्रीकडे विशेष आस्थेने लक्ष देणारे गोऱ्हे गावचे कुमारदादा शिलोत्री यांचेकडील अनेक व्यक्तींना देवीच्या कृपेने व श्रीबाबांच्या आशीर्वादाने खूपच चांगले अनुभव आले. तसेच दोन-तीन वर्षे सतत औषध घेणाऱ्या व्यक्ती केवळ अंगारा लावून १५ दिवसात बऱ्या झाल्या आहेत. अनेकांचे प्लॉटस श्री. जोशीबुवांनी बघून त्यांनी सांगितलेल्या दिशेने घरे बांधली व त्यामुळे त्यांचा

उत्कर्ष झाला आहे. अनेक ठिकाणी जमिनीची ज्योतिषशास्त्राचे आधारे त्यांनी पहाणी करून विहिरी खणल्या तो काय त्या ठिकाणी भरपूर पाणी लागलेले आहे.

५) शेतकऱ्यांची जनावरे गुरे मरत असल्यास त्यांना उपाय सांगून देवीच्या कृपेने गोठ्यात जनावरे जगू लागली व अनेक शेतकऱ्यांची कामे झाली हे वाडे तालुक्यात बऱ्याच शेतकऱ्यांचे बाबतीत घडले आहे.

६) श्री. रामराव यांना संतती नव्हती. वयाच्या ५२ व्या वर्षी त्यांना जोशींच्या कृपाप्रसादाने पहिला मुलगा झाला. डॉक्टर मंडळींनी संततीची आशा सोडा असे सांगितले होते.

७) अनेकांना सांगितलेल्या तारखांप्रमाणे कोर्टाचे निकाल देवीच्या कृपेने लागलेले आहेत. खोट्या केसीसचा अनुभव लगेच मिळतो. गुरूचरित्रातील ठराविक अध्याय व देवीची उपासना यामुळे केसींना जय अनेकाना मिळाला आहे.

८) स्वतः श्री. काणे महाराजांना तुपाच्या अंघोळी, सप्तशतीचे पाठ व २४१ घोंगड्या हे दान दाजीसाहेबांनी महाराजांचे दुखण्यात घावयास लावले व त्यामुळे त्यांना बरे वाटले असे महाराजांचे पत्र आहे.

९) श्री. एस. वी. चांदगुडे, पळीपुरा, जुनामोंढा, औरंगाबाद यांची अनेक कामे आता दाजींच्याकडे येऊन मार्गाला लागली आहेत.

१०) श्री. रमेश नाईक मुंबई या उभयता पतीपत्नींना देवीदरबारात आल्यावर अनेक दिवस नोकऱ्या नव्हत्या त्या आता नोकऱ्या त्यांना लागल्या आहेत.

११) डॉ. भनोत्रा व कु. आशा भनोत्रा या दोघा पिता-पुत्रींचे अनेक वर्षांचे पायाचे दुखणे डॉक्टरी उपायांनी बरे झाले नाही पण दाजींच्याकडे येऊन उपाय केल्यावर दोघेही आता चांगले चालू लागले.

१२) सौ. प्रतिभा विजय टिपणीस, हिंदुकॉलनी, गल्ली नं.२ दादर येथे रहाणाऱ्या महिलेचे मंगळसूत्र हरवले होते. तीन महिने सापडत नव्हते. दाजींनी सुचविलेल्या उपायांनी सात दिवसात मंगळसूत्र सापडले.

१३) श्रीमती सरोज गोरीमार यांच्या मुलाच्या फीटस दाजींच्या उपायांनी बंद झाल्या आहेत.

१४) श्री. पुरुषोत्तम मुरलीधर अत्रे, ३६ गोखले रोड, कुबलनिवास, दादर २८ यांचे पत्नीला अनेक उपाय करूनही काही गुण येत नव्हता, दाजींच्या उपायानी गुण येत आहे.

१५) श्री. डी. ए. दंडवते, सायुज्य बंगला, भगवती कॉलनी, जालना रोड, औरंगाबाद यांचा मुलगा वयाच्या सहाव्या महिन्यापासून आजारी आहे. त्याच्या आजारपणाची छाननी करून जोशींनी त्यांना मार्गदर्शन केले व मुलगा आता सुधारत आहे.

१६) डॉ. रंजन हे दाजींनी सांगितलेल्या तारखेला परदेशात गेले.

१७) श्री. जे. ए. बागवान, ६२४ गुरुवार पेठ, सातारा. श्री. आत्माराम रेगे, श्री. पी. के. मरचंट, लक्ष्मी रोड, पुणे. सौ. शकुन स्वरूप, श्री. मुरलीधर निंबाळकर, नवी पेठ, पुणे. श्री. कदम, हिंदुस्थान लिव्हर, तळोजा. श्री. चकोर आजगावकर, श्री. सदाशिव गोविंद आयरे, जव्हार. श्री. वासुदेवराव सकपाळ, दादर इ० भक्तमंडळींना श्री. जोशींचा चांगला अनुभव आलेला आहे हे सांगण्यास आनंद वाटतो. ●

# साईबाबांची ती मूर्ती मला सांगत होती— मला घरी ने !

## ...होरमजदियार यांचा बोलका अनुभव...

● मुंबईला प्रसिद्ध होणाऱ्या 'मुंबई समाचार' या गुजराती दैनिकात श्री. होरमजदियार दलाल या गृहस्थानी साईबाबांच्या एका मूर्तीविषयीचा अनुभव निवेदन केला आहे. जिज्ञासू वाचकांसाठी त्यांनी दिलेला वृत्तांत खाली दिला आहे.

होरमजदियार म्हणतात, फ्लोरा फाऊंटन, कुलाबा भागातील दुकानात ठेवलेल्या वस्तू पाहाण्याचा आणि एखादी सुंदर कलाकृती दिसली तर ती खरेदी करण्याचा मला छंद आहे त्या दिवशी मी असाच निरनिराळ्या दुकानातील कलाकृती पहात फिरत असता युनिव्हर्सिटीसमोरील एका दुकानातील काचेच्या शोकेसमध्ये ठेवलेल्या एका छोट्या मूर्तीकडे माझे लक्ष गेले. ती मूर्ती साईबाबांची होती. मूर्ती फार सुंदर होती. ही कलाकृती घरात ठेवण्यासारखी आहे असे मला वाटते.

मनात मूर्ती खरेदी करण्याची प्रबळ इच्छा झाली पण त्याचबरोबर दुसरेही विचार आले. मी झरतुष्ट्राचा अनुयायी त्याची मूर्ती माझ्या घरी आहे. घरी रोज सकाळ-संध्याकाळ पूजापाठ होतो. साईबाबांची मूर्ती घरी नेली तर लोक काय म्हणतील ? इष्टमित्र काय म्हणतील ? मनुष्याचा धर्म एकच असतो. त्याने दुसऱ्या

धर्माच्या साधुसंताची आराधना करणे योग्य आहे काय ? अशा विचारांनी गर्दी केली. मूर्तीकडे जो जो पहावे तो ती अधिक आकर्षक वाटू लागे. काय करावे समजेना. सबंध दिवस मनात असा गोंधळ चालला होता.

थोडा पुढे गेलो आणि परत त्या दुकानाशी आलो. मी मूर्तीकडे पहात होतो. घ्यावी न घ्यावी काही निर्णय होईना. तोच माझ्या कानात आवाज आला, तू मला तुझ्या घरी घेऊन जा ! मी चक्रावलो हे काय ? मला भ्रम तर झाला नाही ना ? एवढ्यात दुकान बंद झाले व मी तेथून निघालो.

घरी आलो. रोजचे व्यवहार चालूच होते पण डोळ्यासमोर ती मूर्ती येत होती व तो आवाजही येत होता.

दुसऱ्या दिवशी त्या दुकानाशी आलो. शो केसमध्ये ती मूर्ती होती. पुन्हा तोच आवाज – तू मला तुझ्या घरी घेऊन जा ! त्या दिवशीही मूर्ती खरेदी केली नाही. डोक्यात भावना व बुद्धी यांचे द्वंद्व चालले होते.

एक दिवस सकाळी मी माझ्या कामात गुंतलो होतो. तेवढ्यात एक अनोळखी मनुष्य घरात आला पण तो माझा शोध करीतच आला. मी कामात असल्याने त्याला थोडा वेळ थांबण्यास सांगितले. पण तो थांबण्यास तयार नव्हता. तो म्हणाला, मला फार घाई आहे. पण ती मूर्ती आज तुमच्या घरी येणार आहे. एवढे सांगायलाच मी आलो होतो. एवढे सांगून तो निघून गेला.

मी अवाक होऊन त्याच्याकडे पहात राहिलो. हा काय चमत्कार ? यात काही तरी दैवी भाग असावा. आता मात्र एक दिवसही गमवायचा नाही, असा विचार करून मी त्या दिवशी संध्याकाळी त्या दुकानात गेलो. शो केसमध्ये ती मूर्ती होती. ती जणु मला म्हणत होती – अखेर तू आलास ? चल, मी तुझ्या घरी येते.

## संत श्री गजानन महाराजांच्या तसबिरीचे शिरडीत अनावरण

ठाण्याचे संत श्रीगजानन महाराज पट्टेकर ह्यांच्या सुंदर तसबिरीचे अनावरण, वैशाखी पौर्णिमा व बुद्धजयंतीच्या सुमुहूर्तावर, सोमवार दिनांक २२ मे १९७८ रोजी, 'शांती निवास' मधील सभागृहात, शिर्डी संस्थानचे (त्यावेळचे) कोर्ट रिसीव्हर माननीय श्री. पाठकसाहेब यांच्या हस्ते झाले. त्याप्रसंगी 'श्रीसाईलीला' मासिकाचे संपादक श्री. सदानंद चेंदवणकर, संस्थानचा अधिकारी वर्ग व बराच भक्तगण हजर होता.

## 'मशिदीत प्रगटला परमेश्वर !'

श्रीसाईबाबांच्या जीवनावर आधारित ही कादंबरी गेल्या गुरुपौर्णिमेच्या दिवशी प्रसिद्ध झाली असून महाराष्ट्रातील एक वेळचे नामांकित चित्रपट दिग्दर्शक श्री. **रघुनाथ शं. जुन्नरकर** यांनी ती लिहिली आहे. कादंबरी वाचायला घेतल्या-नंतर ती संपूर्ण होईपर्यंत सोडवत नाही या एकाच गोष्टीने तिचं मूल्यमापन होतं. लेखकानं स्वतःच्या प्रस्तावनेत आपण साहित्यिक नाही असं म्हटलं असलं तरी बऱ्या-पैकी वाङ्मयीन कृति म्हणण्या इतपत ती निःसंशय चांगली लिहिली गेली आहे. एक पटकथा लेखक आपल्या मानसिक पडद्यावरील दृश्ये किती यशस्वीरित्या शब्दांकित करू शकतो हे या कादंबरीचं वैशिष्ट्य आहे.

कथा परिपोषासाठी बाबांच्या जीवनातील चमत्कारांच्या घटना, त्यांची भक्तांना चमत्कारातून अध्यात्माकडे नेण्याची तळमळ, त्यांचं साधं आदर्श-संत-जीवन यांचं यथायोग्य आणि प्रभावी दर्शन घडविण्याच्या हेतूनं लेखकानं या सर्व घटनांचा मूळ गाभा कायम ठेवून पात्रे आणि प्रसंग यात केलेली अदलाबदल आणि बदल कथा-आविष्कारास पोषकच ठरली आहेत. पहिल्यापासून स्वतःची धारणा आणि श्रद्धे-नुसार लेखकानं श्रीसाईबाबा हा साक्षात् अवतार होता हीच भूमिका घेतल्यानं साई-भक्तांना तर ही कादंबरी म्हणजे भावभक्तीची मेजवानीच वाटेल. बाबांनी घडविलेलं अध्यात्माचं सहजसुंदर दर्शन वाचक आणि भक्त यांच्यापर्यंत पोहोचविण्याची महान कामगिरी या ग्रंथानं पार पाडली असून मानव हाच माधव आहे हे सत्य अतिशय सुंदर रीतीने वाचकांच्या मनावर बिंबविण्याचा लेखकाचा प्रयत्न फारच प्रशंसनीय आहे. हल्लीच्या सर्वसाधारण वाचकाला ओवी-बद्ध संत चरित्र वाचण्याचा कंटाळा येतो. अशा परिस्थितीत बाबांच्या जीवनावरील या कादंबरीची नितांत आवश्यकता होतीच.

कादंबरी घाईत छापून झाल्याने त्यात राहिलेले काही मुद्रण दोष टाळता आले असते तर बरे झाले असते. तरीही परिणामकारक कथनाच्या ओघात वाचकांचे त्याकडे पूर्ण दुर्लक्ष होतं.

कादंबरीला साकुरी आश्रमाच्या सती गोदावरी माताजी यांचे आशीर्वाद लाभ-ल्याने हा ग्रंथ केवळ वाचनीय आहे तर प्रत्येक साईभक्तांच्या कल्याणासाठी तो संग्रही ठेवण्यासारखा झाला आहे. साईभक्तांनी हा ग्रंथ अवश्य वाचून काढावा अशी आम्ही त्यास शिफारस करतो.

**प्रकाशक** : प्रशान्ति प्रकाशन, ९/१३, पिरामलनगर, गोरेगाव (पश्चिम), मुंबई–४०००६२. पृष्ठे : ४२६ मूल्य : रु. ३६/–

# शिरडी-वृत्त माहे जून सन १९७८

जून महिन्यात बाहेरगावाहून येणाऱ्या साईभक्तांची गर्दी बरीच होती. काही कलाकारांनी श्रीपुढे हजेरी दिली ती खालीलप्रमाणे :—

**कीर्तन** :- श्री. ग. वि. जोशी शास्त्री संस्थान गवई यांची कीर्तने नेहमीप्रमाणेच झाली.

**प्रवचन** :- १) ह. भ. प. लक्ष्मणबुवा वाघचौरे, शिर्डी.
२) ह. भ. प. बाळकृष्ण सा. नवले, राहुरी.

**भजन गायन** :- १) श्रीमती ज्योती ए. मनुजा, मुंबई.
**वादन** २) श्री. अनिश रा. कोरडे, मुंबई.
३) श्री. अनिलकुमार वि. पुराणिक, सोलापूर.
४) श्री. विठ्ठल म. गोवंडे, सोलापूर. ५) श्री. ज्ञानोबा माहुली, इन्दौर. ६) श्री. आदिनाथ सुईगळ, औरंगाबाद. ७) श्री. प्रकाश वा. ढवस, यवतमाळ. ८) श्री. विश्वनाथ बं. साहाणे, कोपरगाव. ९) स्वामी रामानंद, कर्नूल. १०) श्री. पंडीत दे. राऊत, ठाणे. ११) श्री. रक्षपाल व. होर, मध्यप्रदेश. १२) श्रीमती सिद्धेश्वरी शर्मा, मध्यप्रदेश. १३) श्री. बाबूराव वि. बांदिवडेकर, मुंबई. १४) श्री. गोपाळ वि. गावठे, मुंबई. १५) कु. मंजरी कर्वे, पुणे. १६) श्रीसाई समिती नागदादक्षिण, म. प्र. १७) श्री. धनसिंगस्वामी, पुणे. १८) ऑर्केस्ट्रा प्रोग्राम – श्री. शाम केळकर, कु. उषा सावंत, श्री. कन्हैया इंजिनिअर, प्रवीण पाटील, चंद्रकांत नाईक, अमर काळेकर, सुधीर मेढेकर, यशवंत कदम, बाबूभाई तांबे, अशोक बोरा, विनोद सावंत, माधव केळकर, दादा सावंत, दादर, मुंबई. १९) श्री. श्यामसुंदर सारंगपाणी, सिकंदराबाद. २०) श्री. मधुकर गो. सोनवणे, बडोदा. २१) श्री. के. वी. रमणमूर्ती, आं. प्रदेश. २२) सौ. सत्यवती रमणमूर्ती. २३) श्री. रामचंद्र द. वाडेकर, शिर्डी. २४) श्री. के. आर. व्यंकटेश, मद्रास. २५) श्री. राम-लक्ष्मण, मुंबई. २६) श्री. विलास मित्र मंडळ भजन, लालबाग, मुंबई. २७) श्री. महेंद्र परिहार, इन्दौर.

**माननीयांच्या भेटी :**

१) मा. श्री. शहाजीराव पाटील, सहकार व ग्रामीण विकास मंत्री, महाराष्ट्र मुंबई.

२) मा. श्री. हरीभाऊ जोशी, पंचायत सामुदायिक विकास मंत्री, म. प्र. भोपाळ.

३) मा. श्री. दुबे, न्यायमूर्ती उच्च न्यायालय, इन्दौर.
४) मा. श्री. राम मनोहर त्रिपाठी, नगर विकास, जनसंपर्क राज्यमंत्री, महाराष्ट्र मुंबई.
५) मा. श्री. दलाल I.C.S. माजी लिगल डिपार्टमेंट सेक्रेटरी, मुंबई.
६) मा. श्री. पी. डी. कसबेकर, I.A.S. सेक्रेटरी इंडस्ट्रीज ॲण्ड लेबर डिपार्टमेंट, महाराष्ट्र मुंबई.
७) मा. श्री. डी. जे मदन, I.A.S. चेअरमन, कोकण डेव्हलपमेंट महाराष्ट्र.
८) मा. श्री. बाळासाहेब भारदे, अध्यक्ष खादी महामंडळ, महाराष्ट्र.
९) मा. श्री. रामनाथ वाघ, अध्यक्ष जिल्हा परिषद, अ. नगर.
१०) मा. श्री. रामराव आदिक, न्याय, विधी, पाटबंधारे मंत्री, महाराष्ट्र मुंबई.
११) मा. श्री. बी. एन. आडारकर, चेअरमन महाराष्ट्र राज्य परिवहन महामंडळ मुंबई.
१२) मा. श्री. बर्मा, इन्कम टॅक्स कमीशनर महाराष्ट्र.
१३) मा. श्री. जितकर, जिल्हाधिकारी अहमदनगर.

**हवापाणी** :– शिरडी येथील हवापाणी उत्तम असून रोगराई काही नाही.

## श्रीसाईलीला वर्गणीदारांनो

## —कृपया लक्ष द्या—

श्रीसाईलीला मासिकाचे अनेक वर्गणीदार आपली वर्गणी शिर्डी कचेरीत भरतात किंवा पाठवितात. असे करताना ते आपले नाव व पत्ता मनीऑर्डर कूपनमध्ये स्पष्टपणे लिहित नाहीत तसेच कोणत्या भाषेत अंक हवा आहे इंग्रजी की मराठी हे पण लिहित नाहीत.

श्रीसाईलीला मासिकाचा सर्व कारभार व व्यवस्था संपूर्णपणे मुंबई कार्यालयातून होत असल्याने वर्गणीदारांनी आपली वर्गणी यापुढे मुंबई कार्यालयाकडेच पाठवावी किंवा भरणा करावी. मुंबई कार्यालयाचा पत्ता असा—

संपादक श्रीसाईलीला, 'साईनिकेतन,' ८०४ बी, डॉ. आंबेडकर मार्ग, दादर, मुंबई–४०००१४

तसेच वर्गणी पाठविताना आपले संपूर्ण नाव व पत्ता वर्गणी कोणत्या महिन्यापासून व कोणत्या भाषेतील अंक हवा ते पण मनीऑर्डर कूपनमध्ये सूचित केल्यास उभयपक्षी होणारी गैरसोय टाळता येईल. —संपादक

# — साई गीत —

एके दिवशी गोदातीरी चमत्कार झाला
लग्न-वरातीतुनी शिरडीला देवपुत्र आला ॥ ध्रु० ॥

कोण असे तो आला कुठुनि ज्ञातही न झाला
कुणी न पाही असे कुणीही फकीर तो आला
माहित नव्हतें नांव तयाचे गावही न त्याला
कुणी न जाणें धर्म तयाचा असेल तो कुठला ॥ ध्रु० ॥

आणि अचानक 'आवो साई' दिव्य शब्द आले
प्रभू-कुमारा नाम 'साई' तें शिरोधार्य झालें
म्हाळसापती खंडोबाचा भक्त तो महान
मुखीं तयाच्या जणू प्रभूनें दिले साई नाम ॥ ध्रु० ॥

देवपुत्र तो होऊनी साई शिरडीला राही
अजाण लोकां करी धरूनी भक्तिमार्ग दावी
बुद्धिवंत जे मानित नव्हते देवतुल्य साई
अनुभवानें रुजे तयांच्या श्रद्धाही हृदयीं ॥ ध्रु० ॥

हळू हळू मग 'साई' नाम तें दिगंतरा जाई
नाम-घोष तो असे चालला आज साई साई
त्रैलोक्याची झुकते मान साईंच्या चरणी
सगूण रूपी जरी आज तो न वसे या धरणी ॥ ध्रु० ॥

मानवता हा धर्म साईला समता ही जात
ससाच साई मनी भेद ना धर्म आणि पंथ
भेद नसे वा साई मंदिरी गरीब श्रीमंत
मनी जयाच्या असे भाव तो स्वागतास पात्र ॥ ध्रु० ॥

भाव अभावी नको साईला पुजा अभिषेक
हवी तयाला पुजा एकची श्रद्धा हृदयांत
शिरडी आतां नवी पंढरी रखुमाई साई
समान सारे भक्त शिरडीला धर्म असो काही ॥ ध्रु० ॥

शब्द साईंचे कळती आतां अचूक ते होते
शिरडीमाजी भक्तजनांची झुंबड जी उडते

जिथें रंगल्या साईलीला सगूण रूपांत
धन्य असे ती शिरडी जेथें साई सहवास ॥ ध्रु० ॥

भक्त रक्षणी आजही दावी साई चमत्कार
सगूण साई परी एकला दिव्य चमत्कार
फिरूनी एकदा येईल ऐसा दिव्य साई काळ
मनांत येतें असेल का तो अमुच्या भाग्यांत ॥ ध्रु० ॥

भक्त थोर ते ज्यांना होता साई सहवास
बघून ज्यांना आजही होतो साईचा भास
वंदन करूनी पहिलें त्यांना कथा ही साईची
समाप्त इथें होत असे ही साई–चरणांशीं ॥ ध्रु० ॥

— ॐ श्री साईनाथाय नमः —

—श्री. एन्. जी. परुळेकर
'केदार,' प्लॉट नं. १७३ अभिनवनगर,
बोरिवली [ पूर्व ] मुंबई ४०००६६

[ ही कविता सौ. अलका रिसबाडकर यांच्या मधुर कंठातून श्रीसाईलीला लेखक–कवी चतुर्थ स्नेहसंमेलन प्रसंगी शिरडीत प्रथमच गायिली गेली होती. ]

# साईचे मंदिरी

साईचे मंदिरी उभा क्षणभरी
जेणे तृप्ती सारी पाहिजेल्या
जरी सुखे मना करी उभे घना
करावी करुणा होय तरी ॥ १ ॥
बसोनी आळवी माझा तो श्रीहरी
भेदमात्र न धरी बाह्य सदा
मंदिरात आहे बाबाचिये खुणा
साईला भेटवा माझा तो श्रीहरी ॥ २ ॥

—सौ. माई. रा. आडकर,
२४०५ बार्शी, जि. सोलापूर

# श्रीसाई काव्य-सुमनांजली

स्मरा वदाहो साई सद्‌गुरू । साई सद्‌गुरू भवभय नाश करू ॥ धृ० ॥

साई नाम मुखे नित्य वदता वा स्मरता ।
आपत्ती, विपत्ती भवभय विलया जाता ।
नेती भवसागरातूनी पैलपारू सुखरूपता ।
स्मरा वदाहो साई सद्‌गुरू । साई सद्‌गुरू भवभय नाश करू ॥ १ ॥

साई तव कृपाछत्र मजवरी अक्षय असता ।
साई तव नेत्रकटाक्ष मजवरी सदैव असता ।
साई तूच होतसे मजला पालन कर्ता ।
स्मरा वदाहो साई सद्‌गुरू । साई सद्‌गुरू भवभय नाश करू ॥ २ ॥

साई सद्‌गुरू ती आमुची जगद्‌माता ।
साई सद्‌गुरु तो आमुचा जगद्‌पिता ।
साई सद्‌गुरू ती आमुची जगद्‌बंधुता ।
स्मरा वदाहो साई सद्‌गुरू । साई सद्‌गुरू भवभय नाश करू ॥ ३ ॥

आईच साई ह्या लेकूराची असता ।
मिळवून दे तू जगत् सख्यता ।
विनवितसे तुजला सुनिल आता ।
स्मरा वदाहो साई सद्‌गुरू । साई सद्‌गुरू भवभय नाश करू ॥ ४ ॥

—सुनिल अंबाजीराव सरोदे,
उल्लेगल बि. नं. ६, खोली नं. १०,
एन्. सी. केळकर रोड, दादर, मुंबई—२८

# श्री साई स्तुति

भज मनुवा ! साई बाबा का नाम ।
भजते भजते नाम तिहारो, बिगड़े बनेंगे काम
भज मनुवा ! साई बाबा का नाम ॥ टेक ॥

मोह माया की झूठी आशा, तज अज्ञान अंधेरा ।
क्या तेरा क्या मेरा पगले, जग है रैन बसेरा ॥

अंत समय में साथ चलेंगे, कर नेकी के काम ।
भज मनुवा ! साई बाबा का नाम ॥ १ ॥

साई है आत्मा साई परमात्मा, साई है रूप निराला ।
मंदिर साई मूरत साई, है सबका रखवाला ॥

भक्ति का पथ साई चरण है, साई है मुक्ति धाम ।
भज मनुवा ! साई बाबा का नाम ॥ २ ॥

साई नाम अमृत का प्याला, जो दुःख दर्द मिटावे ।
दूर करे संकट भक्तों के, सुखमय जीवन पावे ॥

पीले प्राणी इस अमृत को, ये है प्रभु का जाम ।
भज मनुवा ! साई बाबा का नाम ॥ ३ ॥

बोलो नाम नाम नाम, साई नाम नाम नाम ।
सद्गुरु नाम नाम नाम, साई नाम नाम नाम ॥

तर्ज–भजन बिना चैन न आवे राम......

—भूरनदास चोरकर
द्वारा डी. बी. सायन्स कॉलेज,
गोंदिया–४४१६०१ (महाराष्ट्र)

# ॥ नमस्कार ॥

लडिवाळ भक्तशामा, माधव अभिदान साईंचे पोर
मानी पुत्रचि साईं, त्याला माझा असो नमस्कार ॥ १ ॥

'या साईं' संबोधी, फकिराला म्हाळसापती थोर
निष्काम भक्तिसेवा, त्याला माझा असो नमस्कार ॥ २ ॥

धुंडी वनात साईं, घेउनि पाटी उन्हात डोईवर
बायजा भाकर नेई, तिजला माझा असो नमस्कार ॥ ३ ॥

लक्ष्मीबाई शिंदे, सेवा भक्तीस ना तिच्या पार
नवदान साईं देई, तिजला माझा असो नमस्कार ॥ ४ ॥

रगडी पाठ जयाची, येता निद्रा तयासि दे मार
साईं, तात्या पाटील, त्याला माझा असो नमस्कार ॥ ५ ॥

देहार्पण साईला, करूनि विनाज्ञा करी न आचार
काका दिक्षित हरि जो, त्याला माझा असो नमस्कार ॥ ६ ॥

लिहिले चरित्र ज्याने, हेमाडासम नसे कथाकार
किति थोर साईंभक्ती ! त्याला माझा असो नमस्कार ॥ ७ ॥

दिधले भोजन साईंस, परि न उमगला तया चमत्कार
श्रीपाद कृष्ण देवा, त्याला माझा असो नमस्कार ॥ ८ ॥

कृष्ण म्हणे प्रिय मजला, मद्भक्तांचे करीस जे स्तवन
मग साईं का न तुष्ट, करिता भक्ताष्टकास मी नमन ?

—श्री. गं. रा. भट
संदेश हौसिंग सोसायटी,
सार्मलवाडी, सोनावाला रोड,
गोरेगाव, पूर्व मुंबई—६३

# श्रीसाईचरणी इच्छा

अहो साईनाथा, करावी त्वा कृपा
क्षम्य करी पापा, घडलेल्या !

घडलेले पाप, मनास टोचणी
करी विनवणी माझे मन !

माझे मन आता, पश्चाताप करी
मनातील वैरी नको मला !

नको मला काही, दर्शनाचा भुका
साईविना मुका, देह माझा !

देह माझा झाला, दर्शना आतुर
तुम्ही दूरदूर, जाऊ नका !

जाऊ नका साई तुम्हाविन कोण ?
काहो वण वण फिरवावे ?

फिरवावे आता माझ्याकडे मन
द्यावे त्वा दर्शन साईनाथा !

साईनाथ आता सुटो उपवास
मृत्यु घेवो घास माझा आता !

—श्री. शिवाजी कौ. मोरे
मु. पो. दोंडाईचा [स्टेशन भाग]
धगधगे निवास समोर
ठाकूर बिल्डिंग दुसरा मजला
ता. शिंदखेडा, जि. धुळे.

# –आशीर्वाद द्यावा–

[ चाल : "चालती पाऊले पंढरीची वाट" सारखी ]

पाऊले चालती । शिरडीची वाट ।
साई परब्रह्म । मनी खूणगाठ ॥ धृ० ॥

द्वारका माई ती । असे ब्रह्मपुरी ।
विश्वरूप तेथे । दिसेल विराट ॥ १ ॥

बारमाह जेथे । अग्निहोत्र आहे ।
विभूती लाविता । खुलेल ललाट ॥ २ ॥

साईनाम ध्यान । करण्याचा ध्यास ।
भक्ती भावनेने । चालवा हा घाट ॥ ३ ॥

अहंकाराचा ना । असो सुळी वारा ।
दिसेल भक्तीचा । नवरंगी हाट ॥ ४ ॥

सत्य संकल्पाचा । दाता साईनाथ ।
तेजः पुंज रूप । भरावे डोळ्यात ॥ ५ ॥

सगुण रूपात । साईस पहावे ।
आशीर्वाद द्यावा । चढतो हा घाट ॥ ६ ॥

–श्री. **विनायक पाठक,**
बी. ए. साहित्यरत्न,
बी. १७–२३४, राजावाडी,
घाटकोपर, मुंबई–७७

(8)



आरती थिएटर्स ( मुंबई ) निर्मित " शिरडीचे श्रीसाईबाबा " या नाटकातील श्रीसाईंच्या मिरवणूकीचे दृश्य.

Regd. NO. MH/BYE/26


# साईबाबा धर्मार्थ दवाखाना

( होमिओपाथिक )

## सर्व धर्मियांकरिता खुले

कृपया या संधीचा जरूर लाभ घ्यावा.

**वेळ :** रोज सकाळी १०-३० ते १२-३० सायंकाळी ४-३० ते ६-३०

रविवार व काही विशिष्ट सुट्टीचे दिवस सोडून

**आकार : दर दिवसास २५ पैसे**

नवीन पेशंटसाठी ५० पैसे नोंदणी फी आकारली जाईल.

**स्त्रियांसाठी खास स्त्री डॉक्टरांची सोय**

## साईबाबा धर्मार्थ दवाखाना

( शामदासानी फौंडेशन )

**नवजीवन हौसिंग सोसायटी,**

ब्लॉक नं. ३, रूम १०४,

लॅमिंग्टन रोड, मुंबई ४००००८


मुद्रक : पांडुरंग मोरे, बॉम्बे नॅशनल प्रिंटर्स प्रा. लि. ४२, जी. डी. आंबेकर रोड, वडाळा, मुंबई-३१. संपादक व प्रकाशक : श्री. क. ही. काकरे, 'साई निकेतन', डॉ. आंबेडकर रोड, खोदादाद सर्कलजवळ, प्लॉट नं. ८०४ बी, दादर, मुंबई-१४.